श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष ४ थें ] फाल्गुन शके १८४९ [ अंक १२.

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम् ।



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥

श्री शंकराचार्य.

संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.

प्रकाशकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड बांद्रे, बी. बी. रेल्वे.

# अनुक्रमणिका.


स्फुट विषय. ... ... ... ... ... ५३२–५६२

महाराजांचे अनुभव ... ... ... ... ५६२–५९२

गुरुप्रसादोद्गार... ... ... ... ... १--१२

श्री साईसच्चरित ... ... ... ... ७५९–७७२


## वर्गणीचे दर.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनीआर्डरीनें आगाऊ रु. ३।≈. व्ही. पी. नें रु. ३॥ फुटकळ अंक ।≈. मागील अंकास शिल्लक असल्यास -॥-

## विनंति.

शके १८४९ चा पहिला चैत्र व वैशाख जोड अंक लवकरच निघेल. वर्गणीदारांनी शके १८४९ सालची वर्गणी पाठवून देण्याची कृपा करावी. ज्या वर्गणीदारांकडून हा जोड अंक निघण्यापूर्वी वर्गणी देणार नाही, त्यांचेकडे चैत्र--वैशाख जोड अंक व्ही. पी. नें पाठविला जाईल. व्ही. पी. परत करून आमचें निष्कारण नुकसान करूं नये. ज्यांना यापुढें श्रीसाईलीला नको असेल त्यांनी आम्हांस त्याप्रमाणें आगाऊ कळवावें. म्हणजे त्यांचेकडे व्ही. पी. पाठविली जाणार नाहीं.

व्यवस्थापक.

# याचना.

शके १८४८ चा शेवटचा फाल्गुन महिन्याचा अंक वाचकांस सादर करून त्यांच्या ऋणांतून मुक्त झाल्याचें समाधान आम्हांस वाटत आहे. या अंकांत पूर्वीची राहिलेली पृष्ठें देऊन सबंध वर्षाची मिळवणी केली आहे. या सालांत अधिक मास आल्यामुळें, ज्यास्ती वर्गणी न मागतां १२ चे ऐवजीं १३ अंक आम्हीं दिले आहेत. श्रीसाईलीलेमार्फत, श्रीसाईनाथ महाराजांची व आमच्या वाचकवृंदाची होईल ती अल्प सेवा आम्ही मनापासून निरपेक्ष बुद्धीनें करीत आहोंत. परंतु साईभक्तांकडून आम्हाला जें प्रोत्साहन मिळावयास पाहिजे त्याचा मात्र अभाव आहे ही गोष्ट मोठ्या खेदानें नमूद करावी लागत आहे. ४ वर्षें झालीं तरी अद्याप वर्गणीदारांची संख्या समाधानकारक नाहीं. प्रतिवर्षी कांहीं जुने वर्गणीदार गळतात तर कांहीं नवेही येतात; परंतु गोळा बेरीज घेतल्यास वस्तुस्थिती आहे तीच राहाते. वर्गणीदारांची संख्या हेंच श्री साईलीलेचें जीवन आहे. व त्याचा योग्य परिपोष न झाल्यास तिनें जीवित कोणच्या आधारावर कंठावयाचें ? हल्लींच्या असलेल्या वर्गणीदारांनीं जर एकेक नवा वर्गणीदार मिळवून दिला तर श्रीसाईलीलेच्या पोटापाण्याचा प्रश्न सहज सुटेल. आपणा सर्वांना जिव्हाळ्याचे नातेवाईक, स्नेही वगैरे मंडळी आहेत. त्यांना जर एक हा लहानसा " श्रीसाई लीलेचे वर्गणीदार व्हा " असा सवाल टाकलात तर ते खात्रीनें नाहीं म्हणणार नाहींत. आपलें येवढें वजन त्यांच्यावर खास. आहे.

अखिल हिंदुस्थानांत पुष्कळ माणसें अर्धपोटीं राहिल्यामुळें लवकर कालवश होतात. त्याच कोटींत आपण श्री साईलीले सारख्या पवित्र वस्तूचा स्वाहः होऊन देणार कीं काय ? हा प्रश्न आमचा एकट्याचा नव्हे परंतु सर्व श्री साईभक्तांचा आहे. एक शब्द खर्च केलात तर कार्य होईल. मग तेवढा

आपण श्री साईनाथ महाराजांची स्मृति जागृत ठेवण्याकरितां करणार नाही काय ?

ही एक बाब झाली. दुसरी बाब म्हणजे श्री साईलीलेकरितां लागणारा मजकूर. त्याचीही अलीकडे वाण पडूं लागली आहे. या वर्षांत श्री साईलीलेला जो अनियमितपणा आला त्याला कारण जितक्या आमच्या अपरिहार्य अडचणी झाल्या त्याच मानानें मजकुराची वाण हेंही एक तितकेंच महत्त्वाचे कारण झालें. श्री साईनाथ महाराजांचे अनुभव आजपर्यंत श्री साईलीलेंत आले त्यापेक्षां किती तरी पटीनें ज्यास्ती आहेत व तो सांठा जर श्री साईभक्तांनीं खुला करण्याचें मनावर घेतलें तर मजकुराची वाण आणखी कांहीं वर्षे तरी पडणार नाहीं अशी आमची खात्री आहे. तेव्हां श्री साईभक्तांनों, आतां शिथिलता सोडून आम्हांला या दोन्हीं बाजूनें मनोभावानें मदत करा अशी आमची आपल्यापाशीं सविनय नम्र याचना आहे.

ही याचना आम्ही दरवर्षी करीत आलों आहोंत व त्याप्रमाणें पुढील वर्षाकरितां पुन्हां करीत आहोंत. याचा उपयोग कितपत होईल याचा अंदाज मागील अनुभवांवरून पाहिला तर आशेला फारशी जागा आहे असें वाटत नाहीं. तरी पण इतक्यांत अगदींच निराश न होतां, आहे या स्थितींत आणखी एक वर्षभर आम्हीं श्रीसाईलीलेचें काम नेटानें चालविण्याचें ठरविलें आहे. मात्र श्रीसाईलीलेच्या आजपर्यंतच्या धोरणांत थोडासा फेरबदल करण्याचें योजिलें आहे. आतांपर्यंत महाराजांच्या अनुभवांखेरीज, इतर विषय श्रीसाईलीलेंत फारच थोडया प्रमाणांत आम्हीं घेतले आहेत. पण यापुढें इतर विषयांनां श्रीसाईलीलेंत स्थळ देण्याचें आम्हीं ठरविलें आहे. मात्र विषय धार्मिक स्वरूपाचा असला पाहिजे येवढीच

शर्त आम्हीं त्यांत ठेविली आहे. आमच्या वाचक वर्गांत पुष्कळ प्रसिद्ध विद्वान लेखक आहेत व त्यांचेकडून आम्हांला या बाजूनें पूर्ण सहाय्य मिळेल असा भरवंसा आहे. याशिवाय प्रवासात्मक यात्रेची वर्णनें, आमच्या ध्येयाला पोषक अशीं चरित्रेंही मधून मधून देण्याचें ठरविलें आहे. काव्या- लाही योग्य स्थान पूर्वी प्रमाणें मिळेल. मात्र हें आश्वासन आम्हीं थोडेसें भीत भीतच देत आहोंत. आमचा पूर्वीचा अनुभव असा आहे कीं कवी कोटींत मोडण्याची इर्षा धरून काव्य लिहिणारी बरीच मंडळी आहेत. जरी आम्हांला मजकुराची वाण भासत आहे, तरी काव्याची वाण कधीं भासली नाहीं हें आम्हीं प्रांजळपणें कबूल करतों. कांहींजण तर ५०–७५ पानांचें कवि- तेचें बाड आमचेकडे पाठवितात व "मजकूर नाहीं म्हणतां, हा घ्या मजकूर" म्हणून वर फुशारकीनें सांगितात. आमचें आश्वासन या कोटींतील कविवर्यां- करितां मात्र नाहीं. श्रीसाई लीलेंत दर अंकांत १८–२० पानें श्रीसाई सच्चरिताचीं काव्यरूपानें असतातच. त्यामुळें इतर कविता आम्हांला मर्यादित ठेवाव्या लागतात. वाचक वृंदांत कवित्वाचे भोक्ते थोडे असून त्यांना गद्य मजकूर हवा असतो. अशा कुचंबणींत, सर्वच कवितांना आम्हांला स्थळ देतां येत नाहीं, याबद्दल कविवर्यांनीं आम्हांला क्षमा करावी. जो कवित्व करतो तो गद्यही लिहूं शकेल व त्यांनीं गद्य मजकूर पाठविल्यास आमचेवर उपकार होतील. विषयांचें क्षेत्र आम्हीं वाढविलें आहे तेव्हां काय लिहावें ही अडचण राहिली नाहीं.

श्री सांईसच्चरित "हेमाडपंत" लवकर पुरें करणार आहेत. त्या ऐवजीं पुढें आम्हीं महाराष्ट्रांतील प्राचीन कवींचीं अप्रसिद्ध काव्यें देण्याचें ठरविलें आहे. अप्रसिद्ध अशीं कांहीं सुंदर काव्यें आम्हीं मिळविलीं आहेत. आपल्यापैकीं ह. भ. प. दासगणू बुवांची पुष्कळ कविता व आल्यानें अप्र- सिद्ध आहेत, तींही मधून मधून देण्याचें ठरविलें आहे.

आतांपर्यंत श्री सद्गुरुसाईनाथांचें चरित्र गद्यांत लिहितां येईल इतकी सामुग्री श्रीसाईलीलेंत जमली आहे. तिचें समीकरण करून सुसंवद्ध निरनिराळे विभाग पाडून महाराजांचें गद्य चरित्र लिहिण्याचें एका साईभक्तानें आश्वासन दिलें आहे. याशिवाय भक्तांकडून येणारे अनुभव नेहमीं प्रमाणें येतीलच. वरील प्रमाणें सर्व बाजूनें सजविल्यास श्री साईलीला सर्वांगसुंदर होईल व वाचक वर्गाच्या पूर्ण प्रेमाला पात्र होईल अशी आम्हांला उमेद आहे.

पुढील वर्षाचा जोड अंक लवकरच बाहेर पडेल व त्यानंतरचे अंक दरमहा नियमितपणें प्रसिद्ध करण्याची शक्य ती खबरदारी आम्हीं घेऊं इतकेंच आश्वासन आम्हीं तूर्त देऊन ठेवितों.

या जोड अंकांत श्रीशिरडी येथील रामनवमीच्या उत्सवाची साग्र हकीकत, त्या उत्सवाकरितां ह. भ. प. दासगणू बुवांच्या आमंत्रणावरून आलेले मोंगलाईंतील पाचले गांवचे बालसाधू श्रीनरसिंहबाबा महाराज यांचें छायाचित्र, त्यांचे अलौकिक चमत्कार, त्यांचे संबंधीं त्यांचे गांवीं जाऊन मुद्दाम मिळविलेली त्यांची चरित्रात्मक माहिती, निरनिराळ्या प्रसंगाचे देखावे, त्यांचा नाशीक, पुणें, नगर, सांताक्रूझ, वांद्रें येथील संचार, कै. काकासाहेब दीक्षितांच्या चरित्राचा राहिलेला उत्तरार्ध वगैरे विषय येतील.

ज्या सद्गुरूंनीं आमचेकडून गेलीं चार वर्षें सेवा घेतली तेच पुढील कार्यास आम्हांला उत्साह देऊन आम्हीं वर रूपरेखा दिलेली योजना आमचे हातून पार पाडतील असा आमचा बळकट भरंवसा आहे.

ॐ तत्सत्

त्याला सांगतो व सांगल बी. काल, परवा—समद्यासनी तू बी काल परवा त्वां होतांना ? लई नामी दिवस वर, निमगांवाकड सूर्य जातो. अशी अल्ला मालकाची करणी. जा काकाला भेट बर. " काल दुपारीं जी गोष्ट श्रीनीं सांगितली त्यांतीलच थोडीशी आठवण येण्याकरितां पुन्हां श्रीनीं आज तीच वाक्यें कालचे गोष्टींतील स्पष्टच सांगितलीं. यावरून मनाची जी कालची समजूत झाली होती कीं, ही सदर गोष्ट आपले प्रश्नाचें उत्तर नाहीं. कारण गोष्ट-श्री-हे दुसऱ्याकडेच पाहात असतां आपले मनांतील हेतू व विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें ते कसे देत असत व मनोमयसाक्षीत्वें त्यांना तें कसें कळलें जात असे याचा स्पष्ट बोध होण्यास त्यांचीच कृपा पूर्णपणें जाहल्याशिवाय आम्हां अज्ञ जीवांना कसें कळणार बरें ? मी वंदन करून मशीदींतून वाड्यांत कै. काकासाहेब यांचे कडेस-श्रीनीं-दिलेला तिळगूळ ( हल्वा ) व झालेली सर्व हकीकत कळविण्यास व देण्यास निघालों. मशीदीच्या बाहेर हल्लींचे श्रीसमाधी मंदिराचे कोपऱ्यापाशीं आलों. तोंच कै. प्रिय काकासाहेबांची ते श्रीकडेस जात असतांनाच भेट झाली व तेथेंच थोडेसें कळविलें. व म्हटलें चला वाड्यांत जाऊं. हा तिळगूळ मला श्रींनीं दिला. तसा आपणही घ्यावा. तेव्हां कै. काकासाहेब किती तरी मृदु वाणीनें म्हणाले "द्या बरें मला तिळगूळ ?" ( त्यांची मृदु व मधुर वाणी ज्या ज्या व्यक्तींनां ऐकावयास सांपडली अशांनाच त्यांच्या वाणीचें स्वारस्य ठावें ) त्यावर म्यां म्हटलें, मी काय थोर आहे ? हें असें कसें शोभेल बरें ? मी तर तुमचा दास, व श्रींसाईंचे वेडें शामदास पोर, हा मान बहुत थोर. मी तिळगूळ देण्यास पात्र नाहीं. थोराशीं थोर साजे. तेव्हां प्रिय काकासाहेब म्हणाले कीं, "श्रींचे लीलेचा आधारभूत जो श्री दासगणूनीं केलेला जो ग्रंथ त्यांत आपण संक्रांतीबद्दल पाहूं. कांहीं आहेच" असें बोलत बोलत आम्हीं वाड्यांत आलों. श्रीदासगणू महाराज हे कोण, काय वगैरे बद्दलची हकीकत स्थलसंकोचास्तव देणें कठीणच. त्यांना मी अद्यापि पाहिलेंच नाहीं. तथापि त्यांचा अधिकार, त्यांचें भाषाप्रभुत्व, श्री कृपेनें झालेली प्रासादिक वाणी,

रसाळ कवित्व, गुरुपदीं अढल निष्ठा, त्यांचे ग्रंथ कर्तृत्वादि अमोल्च होय. व त्यांच्या प्रथम कृतीचे जे दोन ग्रंथ त्यांतील स्वारस्य ज्यांनीं ज्यांनीं चाखलें असेल त्यांनाच ठावें " दासगणूंची रसाळ वाणी किर्तनीं तीही प्रभुत्व वाणी (आणी) कोंकणस्थ असोनी कवित्व करी ॥" या वाक्याचा संदर्भ श्री समर्थ रामदास प्रभूचे दरबारीं कोकणस्थ कवि होते. तसेच हे (दासगणू) श्री साई दरबारींही आहेत. दासगणूंचा दुसरा ग्रंथ एकसष्ट अध्यायांचा. त्यांतील ५७ वा अध्याय काढून पाहिला व तो अध्याय कै. काकासाहेब वाचित असतां व मी ऐकत असतां कै. बाळासाहेब भाटे मामलेदार (पेन्शनर) व एक शास्त्री बाबा (हे शास्त्रीबाबा श्रींच्या दर्शनासाठीं परगांवाचेच आलेले होते.) असे वर आले. " काय चाललें आहे? व काय पाहातां?" असा ह्या उभयतांनीं श्री. काकांना प्रश्न केला. "संक्रांतीबद्दलचा उल्लेख पाहातों." असें काकासाहेब म्हणाले. मग मी श्रीमुखांतून काल व आज निघालेली हकीकत सांगितली. त्यावर त्या शास्त्रीबाबांनीं सांगितलें कीं, "धर्मराजानें श्रीभीष्माचार्यासीं प्रश्न संक्रांतीबद्दलचा केला होता. व भीष्माचार्य उत्तरायणाची वाट पाहात होते" आदि हकीकत ऐकून श्रींचे सर्व वाणीबद्दल मला जसजसें सुचत गेलें तसतसें सांगितलें. पुढें आम्ही दुपारचे आरतीस गेलों. आरती वगैरे आटोपल्यावर परत वाड्यांत आलों. त्या दिवशीं कै. काकासाहेब यांच्यांशीं बोलण्याचा जेव्हां जेव्हां प्रसंग येई, त्या त्या वेळेस आम्ही त्या गोष्टीचा खल करीत असूं व मीही आपले ठायीं पुन्हां पुन्हां श्रींचे कौतुकाचे व वाणीचा विचार करित करित तो शुभ दिवस बहुतच आनंदांत घालविला. ह्या खेपेस श्रीसान्निध्यें बरेंच दिवस म्हणजे माघ शु ॥१५ पर्यंत माझें राहाणें जाहलें होतें. या माघ शु ॥१५ पर्यंत अनेक थोर थोर व्यक्ती तेथें आल्या व गेल्या. व त्यावेळेस श्रींच्या नित्य लीला कांहींना कांहीं तरी होतच असत. साईलीलारूपी समुद्राचा अंत लागणें केव्हांही अशक्यच होय. त्या (पौर्णिमे) पंधरापर्यंत ज्यास्तींत ज्यास्त माझ्या आठवणींत ज्या राहिलेल्या दोन अमोलिक लीला त्यां पैकीं एक श्रीसगुणमूर्ति-शिर्डीस असूनही भक्तकाजास्तव (संकटहरणास्तव) शामसुंदर

वारूवर आरूढ होऊन भक्तांचें संकट निवारण कसें केलें गेलें व शामसुंदर वारूंची त्यावेळची मशिदींत झालेली स्थिति ही एक लीला व दुसरी माघ शु ॥१० गुरुवार या दिवशीं रौप्य पादुकांचा श्रीकरीं झालेल्या अमोलिक लाभाची लीला ह्याबद्दलचें स्पष्टीकरण श्रींच्या पूर्ण आशिर्वादें व त्यांचेच दृढ प्रेरणेनें जेव्हां वदवून घ्यावयाचें असेल तेव्हांच ते घेतील, तोंपर्यंत हे मना, तूं सद्गुरुरायांच्या स्वरूपसागराचा ठाव बुडी मारून घे. तो कसा तर पुढील पदाप्रमाणेंच—

॥ पद ॥

( चाल-हरिभजना वीण काळ घालवूं. )

मार बुडी घेइ ठाव-रूपसागराचा ॥धृ०॥ रूपसागराचा ॥२ दां ॥  
अतळ तलामल विनलीं, तेवी रसातल सुतलीं ॥  
शोध करी पातालीं, प्रेम मौक्तिकाचा ॥१॥ मार बुडी......  
प्रेमाचें विमल भुवन, हृदयीं असे वृंदावन ॥  
गवसें जरी करिसी यत्न, लावि शोध त्याचा ॥२॥ मार बुडी....  
ज्ञानदीप धडधड जळे, षडरींची धुंदि गळे ॥  
भ्रांतितमा पद न मिळे, परम ह्या सुखाचा ॥३॥ मार बुडी........  
नौकानय कोण करी, कठिण कठिण भूमिवरी ॥  
सुलभ गड्या तेहितरी; परिस कविरवाचा ॥४॥ मार बुडी........  
परिस परिस परिस सदा, त्यजि खटपट चित्तमुधा ॥  
आश्रय करि नित्यमुदा, सद्गुरुपदाचा ॥ ५ ॥ मार बुडी........

॥ पद ॥

( चाल-धन्य ह्या प्रदक्षिणा० )

॥ अघटित घटना गुरू तुझी रे न कळे ही मजला ॥  
॥ कैक तारले कैक तारसी ह्या मायेच्या पूराला ॥ १ ॥

तरीही शेवटील मागणें जें मागितलें तेंच पुन्हां येथें नमूद करीत आहे.

॥ पद ॥

सांभाळावें सकल जगाला ॥
भक्तिप्रेम तें लागो मजला ॥ सर्वाभूतीं तूंची नटला ।)
ऐसें देणें देई ॥ सकल गुण निधान सांई ॥

किंवा

अंत न लागे तव महिमेचा । गाया श्रमली दुबळी वाचा ॥

हेंच खरें. अस्तु. हा बहुत लांबलेला लेख ज्या साईशप्रभूच्या कृपा-साह्यानें पार पडला, त्या साईशप्रभूराजा तुझें साहाय सर्वांस सारखें मिळून ह्या भवजलनिधींतून आम्हां मानवी प्राण्यांचा उद्धार करणाऱ्या साईश्वरा तुला शतशः प्रणाम असो. श्री साईसुत शंभुदास.

श्री साईनाथ प्रसन्न.

पद १

चाल:–( नमन गुरुपदाला )

वंदन तंव चरणाला ॥
साईमति दे ॥ तंव भजनाला ॥ वंदन० ॥
अज्ञानें मी ग्रासूनि गेलों ॥ तेणें तंव
पदीं भक्ति चुकलों ॥ दासावरि करी पूर्ण
दयेला ॥१॥ वंदन० ॥

पद २

चाल:–( ये सद्गुरुराया. )

ये साईराया ॥ कीर्तनीं ये साइराया ॥
मतिमंद मी कांहींच नेणें । तंव गुण वर्णाया ॥१॥ कीर्तनी ॥

कलियुगामध्यें त्राता नाहीं । तुजविण ताराया ॥२॥ कीर्तनी ॥
शंकर दास विनवितो आतां । कृपा करी राया ॥३॥ कीर्तनी ॥

साईचा दासानुदास

**शंकर वासुदेव सामंत.**

**ठाणें.**

परमार्थमार्गीयांस ज्या ग्रंथश्रवणास श्री साईनाथ शिफारस करीत असत व पाठवीत असत त्या छांदोग्यादि उपनिषदें, भगवद्गीता, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, हरिवरदा व भावार्थ रामायणादि ग्रंथांतील बोधप्रद निवडक उतारे व अशा कित्येक भागांचें

गद्यपद्यात्मकसार

## श्रेय व प्रेय

श्रेय व प्रेय मिश्रित स्थितींत मनुष्यास प्राप्त होत असतात व या दोहांतील हवें त्याचें ग्रहण करावयास पुरुष मुखत्यार आहे. म्हणजे ही आवड-निवड करणें हें त्याचे अगदीं स्वाधीन आहे. तथापि व्यवहार पाहूं जातां श्रेयाला टाळा देऊन पुरुष प्रायः प्रेयाचा स्वीकार करतो आणि जो खरा बुद्धिमान असतो तो दोहींचा चांगला विचार करून प्रेयाहून श्रेयच अधिक श्रेयस्कर असा आपले मनाचा धडा करून श्रेयाचा स्वीकार करतो. कारण तें प्रेयाहून इष्ट आहे असा त्याचा पक्का निश्चय ठरतो. आणि मंदबुद्धि जो असतो तो दोहोंपैकीं तुरत सुख ज्यांत आहे अशा प्रेयाचें अवलंबन करतो. कारण श्रेयाचें साधन व फल प्रेयाचे साधन व फलांपेक्षां अगदीं विपरीत आहे, हें मंदबुद्धीला ठरवितां येत नाहीं. हंसक्षीरन्यायानें हंस जसा दूध व पाणी यांचे मिश्रणांतून दूध तेवढें अलग वेचून त्याचें सेवन करतो तसें मंद-

बुद्धीला साधत नाहीं. प्रेयाचा हेतु संसारांत सुखप्राप्ति हा आहे आणि श्रेयाचा हेतु मोक्ष सुखाची प्राप्ति हा आहे. पण ज्याला संसारांत आपण पुत्र, पशू व आशातृष्णादि शेंकडों पाशांनीं बद्ध स्थितींत पडलों आहों असें आधीं वाटेल तोच त्यांतून आपण मुक्त कसे होऊं या विचाराला लागेल व मग त्या मोक्ष सुखाची परवा करील.

सारांश आत्यंतिक सुखप्राप्तीची ज्याला इच्छा असा धैर्यवान मनुष्यच प्रेयावर म्हणजे आपले देहाचे पशुपुत्रवित्तादि जो योगक्षेम त्यावर लाथ मारून श्रेय तेवढें पतकरतो. कारण तें सुख परिणामीं आहे आणि शरीरादिकांची वृद्धि व त्यांचें रक्षणरूपी जें प्रेय तें आरंभीं सुखकारक पण अंतीं नेहमीं दुःखपरिणामीं असतें. ( कठोपनिषद् )

## नारायण

नारायण म्हणजे काय? नारायण हें एका स्थितीचें नांव आहे आणि साधक जे असतात ते त्या स्थितीचें ध्यान करून त्या ध्यानानें ती स्थिति आत्मसात करीत असतात. म्हणजे कीटकीभृंगी न्यायानें तेही नारायणरूप या स्थितींत तद्रूप होऊन जातात.

त्या स्थितीचें थोडें दिग्दर्शन झालें असतां वाचकांच्या ती चांगली लक्ष्यांत येईल—जीव शीव आणि प्रकृति, अथवा जागृती स्वप्न व सुषुप्ति, किंवा दृश्य दर्शन द्रष्टा इत्यादि त्रिपुटी या सर्वांच्या पलीकडील म्हणजे, चौथी अथवा जिला तुरी असें म्हणतात ती ही सत्व रज आणि तम या त्रैगुण्याचेही पलीकडील अशी जी परमानंद व परिपूर्ण ब्रह्म स्थिति तिलाच नारायण ही संज्ञा आहे. नारायण सर्व व्यापक असल्यामुळें त्रिपुटी मध्यें असूनही तिचेपासून अलिप्तपणें तो राहतो. यालाच—भगवंत असेंही म्हणतात. भग ज्याचे सत्तेंत वागतें तो भगवान्. समग्र ऐश्वर्य, औदार्य, कीर्ति, संपत्ति, ज्ञान व वैराग्य या सहासभग म्हणतात. हे शट्क जे ठायीं परिपूर्णतेनें वास करितें

त्यासच भगवान म्हटलें जातें. एवंगुणविशिष्ट नारायणाचें ध्यान करणारास भगवंताच्या अणिमागरिमादि ज्या मुख्य अष्टसिद्धि त्यापैकीं वशिता म्हणून जी एक सिद्धि आहे ती प्राप्त होते व तिच्या योगें तो सर्व कर्में करून त्या पासून अलिप्त राहूं शकतो व सर्व भोग भोगून अभोक्तेपणांत राहूं शकतो. तात्पर्य, परमानंद प्राप्तीवांचून सकळ कामांची निवृत्ति नाहीं. सूर्योदय झाल्यावर सकल नक्षत्रगणांसह चंद्र जसा निस्तेज होऊन जातो तसा त्या परमानंदा पुढें इंद्रियजन्य सुखाची वार्ताही बाकी राहात नाहीं. या आनंदजन्य सुखापुढें इंद्रियजन्य सुखाची किंमतच नाहीं.

( ए. भागवत )

## कृतयुग व त्रेतायुग

कृतयुगाचें थोडक्यांत लक्षण सांगावयाचें म्हणजे त्या युगांत सर्वच लोक जन्मतःच कृतकृत्य असत. त्या युगांत वेदपठण कसें तें कोणास ठाऊक नव्हतें. चारी वर्णाचें त्या काळीं नांवही नव्हतें. सोहं हंसाचें ध्यानापलीकडे दुसरें कर्मच कोणी जाणत नसे. त्याकाळीं ॐ या एकाक्षरी मंत्राचेंच पठण. तप, सत्य, दया व शुद्धता हे चार ज्याचे पाद असा वृषरूपधारी धर्म त्या काळीं प्रचलीत असे. कपटाचरणाचें नांवही तेव्हां नव्हतें. सत्वगुणाचें प्राधान्य असल्यामुळें त्या युगांत सर्वच सत्वनिष्ट व धर्मपरायण व सत्यवादी असत. परद्रव्य व परदारा यांचे अभिलाषाला याकाळीं कोठेंही थारा नसे. तेव्हां स्वर्गाला जाण्याची कथा अगर नरकाला जाण्याचें भय यांची वार्ताही नसे व अधर्म काय हेंही कोणाला ठाऊक नसे.

पुढें त्रेतायुगांत कर्ममार्गप्रकट झाले व विराटस्वरूपी जो पुरुषोत्तम त्याचे निश्वासापासून तीन वेद आपापल्या शाखांसह निर्माण झाले व यज्ञयागादिकांची सुरवात झाली. त्या विराट पुरुषा पासून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चारी वर्णांची व गृहस्थाश्रम, ब्रह्मचर्य,वानप्रस्थ व संन्यास या चारी आश्रमांची

उत्पत्ति झाली व स्वधर्माचरण म्हणून जें म्हणतात तें प्रथमतः या युगांत जन्मास आलें. सत्वगुणाचें प्राधान्य ज्याच्यांत तो ब्राह्मणत्व पावला. सत्व आणि रज या गुणांच्या योगानें क्षत्रियत्व पावला. रज व तम यांच्या मिश्रणानें वैश्य ठरला व तम प्राधान्यानें शूद्र ठरला गेला.

(ए. भागवत)

## श्री साईदत्तचिदात्मनेनमः

सप्रेम सा. न. वि. वि. खालील मजकुरास व अनुभवास आपल्या विबुधमान्य श्रीसाईलीलेच्या एखादे अंकीं स्थान मिळावें अशी नम्र विनंति आहे.

बाबांच्या चरित्ररत्नाकर सामग्रीच्या ७७ बाबींपैकीं गेल्याचे मागील जोड अंकांत " बाबांनी श्री गोदावरी तीरावरच कां निवास केला" या प्रथम बाबीसंबंधानें अल्प विवेचन केलें. परंतु त्यांत दिलेल्या अनुक्रमाप्रमाणें क्रमवार माहिती मला आजच उपलब्ध नाहीं. ती शोधून काढिली पाहिजे. करितां जी जी माहिती मजजवळ आहे किंवा जी जी आजपर्यंत मला उपलब्ध झालेली आहे ती ती अनुक्रम सोडून देणें भाग पडत आहे. करितां आज त्यापैकीं एका बाबीसंबंधानें चार शब्द लिहिण्याचें योजिलें आहे.

## बाबा हिंदु का मुसलमान

सकृद्दर्शनीं हा प्रश्न सोडविणें फार बिकट दिसतें. परंतु विचारांतीं तो तितका कठीण नाहीं असेंच वाटेल. कारण हिंदुत्व किंवा यवनत्व कोणाला? बाबांना ? परमात्म्याला ? परब्रह्माला ? सच्चिदानंदाला ?

" ते कीर अनाम अजाती "

खरोखर त्या परब्रह्मास नांव नाहीं व जातही नाहीं असें श्रीज्ञानेश्वरांनी श्री ज्ञानेश्वरी अ. १७ श्लोक २३ ओंवी २९ यांतील प्रथमचरणांत लिहिलें आहे. तसेंच

कस्त्वं शिशो कस्य कुतोऽसि गंता ।
किं नाम ते त्वं कुत आगतोऽसि ॥

हे मुला तूं कोण, कोणाचा, तूं कुठें जाणार, तुझें नांव काय, तूं कोठून आलास, वगैरे प्रश्न सद्गुरुनीं विचारल्यावर

नाहं मनुष्यो नच देवयक्षो ।
न ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्रः ॥
न ब्रह्मचारी न गृही वनस्थो ।
भिक्षु र्न चाहं निजबोधरूपः ॥

मी मनुष्य नाहीं, मी देव नाहीं, मी यक्ष नाहीं, मी ब्राह्मण नाहीं, मी क्षत्रिय नाहीं, मी वैश्य नाहीं, मी शूद्र नाहीं, मी ब्रह्मचारी नाहीं, मी गृहस्थाश्रमी नाहीं, मी वानप्रस्थाश्रमी नाहीं, मी संन्यासी नाहीं. तर मी आत्मज्ञान मूर्ति आहे, असें श्रीमत्परमहंस परमपूज्य श्री हस्तामलकांनी उत्तर दिलें.

(आचार्यकृत बृहत्स्तोत्ररत्नाकर ३६१ हस्तामलकस्तोत्र)

यावरून बाबा "नायं न हिंदु र्यवनो न म्लेंच्छः" हे हिंदु नाहींत यवन नाहींत, म्लेंच्छ नाहींत. त्यांस नांव नाहीं, जात नाहीं, त्यांस वर्ण नाहीं, त्यांस आश्रम नाहीं असेंच म्हणावें लागतें. वास्तविक पाहतां परमात्म मूर्ति ज्ञानावतार साधुसंतास नांव, जात, गोत, वर्ण, आश्रम, योनि, धर्म, कसला ? परंतु हा विचार त्या परब्रह्माच्या निर्गुण स्वरूपाबद्दलचा झाला. तरी सुद्धां संसाराटवींत भ्रमण कर करून नितांत श्रांत झालेल्या जीवांनीं त्या निर्गुण स्वरूप परब्रह्मास आपली दाद लावून घेण्याकरितां कोणत्या नांवानें हांक

मारावी, कोणत्या नांवानें त्याचा धांवा करून त्यास आळवावें एतदर्थ श्रुतिमाउलीनें त्या निर्गुण स्वरूपासही "ॐ" असें नामाभिधान दिलें आहे. असें श्रीज्ञानेश्वरांनी वरील अ. १७ श्लोक २३ यावरील आपल्या २९ व्या ओंवी पासून पुढील सर्व ओंवीभाष्यांत केलेल्या अर्थावरून दिसतें. व असें जर आहे तर तेंच निर्गुण परब्रह्म जेन्हां सगुणांत येतें तेन्हां तें कोणतें तरी लौकिकी नांव, कोणती तरी लौकिकी जात व कोणता तरी लौकिकी वर्णाश्रमधर्म धारण करतें. व याच न्यायानें आजपर्यंत जगतितलावर झालेले व हल्लींही होत असलेल्या सर्व साधुसंतांनीं लौकिकीं नांवें धारण केलेलीं होतीं व हल्लींही करीत आहेत. त्याच प्रमाणें त्यांना लौकिकी जात व वर्णाश्रय धर्मही होते व हल्लींही आहेत. मग या प्रमाणें विचार केला म्हणजे लौकिकी कां होईना पण बाबा हे हिंदु का यवन, ब्राह्मण का क्षत्रिय, ब्रह्मचारी का संन्यासी याबद्दल दोन शब्द लिहिणें केव्हांही अप्रशस्त किंवा अयोग्य होणार नाहीं असें मला वाटतें.

बाबांना त्यांचा भक्तवृन्द "साई, साईबाबा, साईनाथ, साईराज, बावा, बाबा, देव अशा निरनिराळ्या नांवांनीं संबोधित असे व अद्यापीही संबोधीत आहे. वरील निरनिराळ्या नांवांत फक्त "साई" हेंच काय तें नांव यवनजातिदर्शक आहे. तेन्हां बाबांचें "साई" हें नांव, त्यांची मशीद, त्यांचें मशीदींतील वास्तव्य, "अल्ला मालिक आहे" हा त्यांचा नेहमीचा मंत्र अथवा उपदेश, "अल्ला तेरा भला करेगा" हा त्यांचा सर्वांस नित्य आशीर्वाद, मशीदींतील त्यांच्या आसनाच्या उजवे बाजूचे भिंती जवळील निंबर व त्यावर घातलेले शेरे व हार, केन्हां केन्हां फात्या देण्यास सांगण्याचा त्यांचा क्रम, शेंडीचा अभाव व दाढीचें अस्तित्व व ते देत असलेली उदी, वगैरे लक्षणांवरून बाबा हे मुसलमान होते असें म्हणतां येईल. तथापि बाबांचे ठिकाणीं वरील लक्षणांविरुद्ध अशी पुष्कळच हिंदुत्वाचीं लक्षणेंही नजरेस पडत.

" बावा " किंवा " बाबा " हें नांव जसें मुसलमानांत रूढ आहे तसें तें हिंदूंतही आहे. व त्याचा एकवचनी व आदरार्थी बहुवचनी संबोधनार्थ उपयोग करण्यांत येतो. हें नांव मुसलमानी म्हणण्यापेक्षां हिंदूच म्हणणें जास्त प्रशस्त दिसतें.

" बाबा " हा शब्द " वप्ता " या मूळ संस्कृत शब्दापासून झालेला आहे असा प्रसिद्ध कै. इतिहाससंशोधक व अनेक भाषाभिज्ञ विद्वद्रत्न श्रीयुत विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनीं आपल्या श्री ज्ञानेश्वरीच्या बहुमोल प्रस्तावनेच्या ६८ पानावर वर पासून १२ वे ओळींत खुलासा केला आहे. तो असाः--

वप्ता=बप्पा=बाप्पा=बावा=बाबा. बाप हें रूपही "वप्ता" या शब्दापासून निघालेलें दिसतें. त्याचा मराठी भाषा बोलणारे सर्वच लोक उपयोग करतात. बा व बापुस् हीं बाप या शब्दाचींच अपभ्रष्ट रूपें आहेत तीं जातींतील लोक उपयोगांत आणतात. " बाप " हा शब्द धन्यर्थींव आश्चर्यार्थींही योजतात.

श्री ज्ञानेश्वरींत " बापा " हा शब्द पुष्कळ वेळां आला आहे. त्याचा उपयोग संबोधन एकवचनी व आदरार्थी बहुवचनींही केलेला आढळतो. ज्ञानेश्वरानीं " बाबा " म्हणजे " अरे बाबा " ( म्हणजे पिता जसें पुत्रास, गुरु जसे शिष्यास किंवा कोणताही वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध व अधिकारी पुरुष जसे ल्हानास किंवा अज्ञान्यास बाबा किंवा अरे बाबा या शब्दानें संबोधून त्यास उपदेशाच्या किंवा त्याच्या हिताच्या गोष्टी सांगतो त्याप्रमाणें ) हा शब्द श्रीकृष्ण परमात्माचे मुखांत घालून त्याचा उपयोग अर्जुनास उपदेश करण्यांत केला आहे. श्री ज्ञानेश्वरी अ. ६, ९, ३, ८; ११ श्लोक २४, ३४, ९,४ ३० ओंवी ७५, २५, ८१, ५८, ४६,

बप्पा किंवा बाप्पा हा शब्द हल्लीं विशेषेंकरून प्रभुज्ञातीच्या लोकांत फार आढळतो. ते बहुधा त्याचा प्रयोग आदरार्थी बहुवचनी करतात.

जसें त्रप्पाजी किंवा बाप्पाजी. या शब्दानें वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध पुरुषास, आतास व पित्यास संबोधतात. गुजराथ प्रदेशांत तर " त्रापा " किंवा " त्रापाजी " हा शब्द वर प्रमाणें उपयोगांत आणण्याचा अतीशय प्रघात आहे.

सर्व हिंदु व मुसलमान जातींत बाबा किंवा वावा या शब्दांचा उपयोग हल्लीं एकवचनांत व सन्मानार्थी बहुवचनांत केला जातो.

" वप्ता " हें रूप " वप्तृ " या मूळ संस्कृत शब्दाच्या प्रथमेच्या एकवचनाचें आहे व " वप्तृ " याचा अर्थ बीज पेरणारा, पिता, राजा, कवी, शहाणा, बुद्धिमान् सर्वज्ञ असा आहे. यावरून बावा किंवा बाबा हा शब्द " वप्ता " या शुद्ध संस्कृत शब्दापासून सिद्ध झालेला आहे त्यामुळें तो शब्द हिंदुदर्शकच आहे, यवनदर्शक नाहीं हेंच सिद्ध होतें. नाथ, राजा व देव हे शब्द तर संस्कृतच आहेत याबद्दल कोणाचा वाद असणें शक्य नाहीं. केवळ बावा या नांवाच्या उपपत्तीवरून बाबांचें हिंदुत्व सिद्ध करण्याकरतां जीं दुसरीं लक्षणें आहेत त्यापैकीं " बाबा " हें नांव हेंही एक लक्षण आहे इतकेंच.

बाबा सर्व स्त्रियांस मोठ्यांस 'आई' व लहानास 'बाई' किंवा 'पोरी' या एकाच नांवानें संबोधीत. त्यांनीं कोणास ' मा ' म्हणून संबोधिल्याचें ऐकिवांत नाहीं.

बाबा आपली तिन्ही वेळची आरती व दुपारची पूजा हिंदूकडून म्हणजे ब्राह्मणाकडूनच करवून घेत. व त्यांची प्रथम पूजा परमपूज्य कै. नानासाहेब चांदोरकर यांचे चिरंजीव बापूराव यांनीं केली. तोंपर्यंत ते कोणाकडूनच पूजा करून घेत नसत. व तेव्हांपासूनच बाबांची षोडशोपचार पूजाअर्चा करण्याचा प्रघात सुरू झाला.

बाबांचे मशिदींत धुनी रूपानें अग्निनारायण अखंड प्रज्वलित असे. कोणत्याही मशीदींत धुनी आढळत नाहीं, इतकेंच नव्हे पण मशीदींत अग्नि ठेवणें हें मुसलमानी धर्माविरुद्ध आहे.

" धुनी " हा शब्द संस्कृतांत ऱ्हस्व इकारांत किंवा दीर्घ ईकारांत सांपडतो. परंतु त्याचा अर्थ नदी किंवा सागर असा आहे. हा अर्थ येथें लागू पडत नाहीं. दीर्घ ऊकारांत " धू " धातूपासून " धुनी " हा शब्द झाला असावा असें मला वाटतें. कारण " धू " धातूचा अर्थ हलणें, कांपणें, अग्नि प्रज्वलित करणें असा आहे. " धू " धातूचें भूतभूतकालवाचक रूप " धूत " किंवा " धून " असें होतें. " धून " या भूतभूतकालवाचक रूपा-पासूनच " धुनी " हा शब्द तयार झाला असला पाहिजे. व त्याचा अर्थ ज्या ठिकाणीं अग्नि पेटलेला अथवा प्रज्वलित केलेला असतो ती जागा. संस्कृत शब्द जेव्हां मराठींत येतात तेव्हां ऱ्हस्वाचे ठिकाणीं दीर्घ व दीर्घाचे ठिकाणीं ऱ्हस्व व एका अक्षराचे ठिकाणीं दुसरें अक्षर अशाप्रकारचे पुष्कळसे त्या शब्दांत विकार किंवा बदल होत असतात हें सुप्रसिद्धच आहे. व अशा विकारास अपभ्रंश म्हणतात व अशा विकारी रूपास किंवा शब्दास अपभ्रष्ट रूप किंवा अपभ्रष्ट शब्द म्हणतात. याच न्यायानें "धून" या संस्कृत शब्दाचें "धुनी" हें अपभ्रष्ट रूप आहे. उदाहरणार्थ चूर्ण, चुना चूण चुणो. ( गुरास खावयास घालतात ती अगर धोतराची, लुगड्याची, अंगरख्याची अगर मराठेशाही तुमानींची ) पर्ण, पान खनि खाण.

वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं 'धुनी' या शब्दाचें मूळ संस्कृतांत आहे. व अशी धुनी बाबांनीं मशीदींत ठेविली होती हेंही त्यांच्या अनेक हिंदुत्व लक्षणांपैकीं एक लक्षण आहे असें मला वाटतें. त्याच मशी-दीच्या आवारांत एक तुलसीवृंदावन होतें व हल्लींही आहे हेंही एक लक्षण त्यापैकींच होय.

"उदी" हा शब्द संस्कृतांतही आढळतो. व तो " उदी " किंवा "उदि" असा उभय प्रकारचा म्हणजे ऱ्हस्व इकारांत व दीर्घ ईकारांत सांपडतो. माझ्यामतें हाही शब्द संस्कृतच आहे. परंतु याबद्दल सविस्तर माहिती मी पुढें " बाबा व उदी " या बाबीच्या विवेचनांत देणार आहें.

बाबा हे कौपीनवंत म्हणजे लंगोटी नेसणारे, व कफनी घालणारे होते. त्यांनीं कधीं मुसलमानी तुमान विजार किंवा पागोटें घातलेलें कोणी पाहिलें नाहीं. यावरून लंगोटी व कफनी हेंही त्यांच्या हिंदुत्व लक्षणा पैकीं एक लक्षण आहे. बाबांची सुंता झालेली नव्हती, त्यांचे कान टोंचलेले होते. बाबा हिंदु का मुसलमान याबद्दल पूर्वी एकदां जेव्हां चर्चा सुरू झाली तेव्हां नानासाहेबांनीं वरील दोन गोष्टींचें (इंद्रिय व कान) स्वतः सूक्ष्म निरीक्षण करून आपलीं खात्री करून घेतली. व त्यानंतरही बाबा हिंदूच आहेत यवन नाहींत अशी दुसऱ्या अनेक कारणावरून त्यांची खात्री पटत गेली. त्यांच्या मतें बाबा हे हिंदूच होते. इतकेंच नव्हे तर ते :ब्राह्मण असून संन्यासी होते. ते दिवसांतून "नारायण" नामाचा उच्चार अन्यरूपानें फार वेळ करीत. "तो नारायण तेलीं फार वाइट आहे नारायण तेली मला फार त्रास तो. तूं येथें राहूं नकोस असें तो नारायण तेली मला म्हणतो. मी या नारायण तेल्याच्या बापाचें काय खाल्लें आहे ? नारायण तेली मला असें काय म्हणून म्हणणार ? मी नारायण तेल्याचे बापासही भिणार नाहीं. नारायण तेली चांगला नाहीं. नाना तूं या नारायण तेल्यास गांवांतून हांकून दे. नारायण तेली मला लइ छळतो. या नारायण तेल्याचे त्रासानें मला अन्न पाणी गोड लागत नाहीं. नारायण तेली लई वंगाळ आहे. नारायण तेली मला शिव्या देतो." वगैरे वगैरे.

संन्याशास शिखा ( शेंडी ) व सूत्र ( यज्ञोपवीत=जानवें ) नसतें हें प्रसिद्धच आहे.

बाबा फार करून मराठी भाषाच बोलत. यावनी भाषा क्वचितच बोलत. किंवा प्रसंगविशेषीं बोलत, पण ती शुद्ध यावनी नसे. हिंदु व मुसलमान या दोन्ही जातींशीं पूर्ण समतेचें वर्तन असल्याकारणानें व वर लिहिल्याप्रमाणें कांहीं यवन लक्षणेंही त्यांचे ठिकाणीं वरकांती दृग्गोचर होत असल्याकारणानें तें हिंदु का यवन हा प्रश्न मोठमोठ्या :चिकित्सक विद्वज्जनांस

सुद्धां घोटाळ्याचा होऊन बसला आहे. तथापि वर दिलेल्या हिंदु लक्षणावरून ते हिंदूच होते असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. बाबांनीं कोणाही यवनास कुराण सांगितलें नाहीं. ते निमाज पढत नसत. त्यांना संस्कृत चांगलें येत होतें. याबद्दलची सविस्तर हकीकत मी स्वतंत्रपणें पुढें देणार आहे. परंतु त्यांनीं कै. नानासाहेबांस सर्व भगवद्गीता फार मार्मिकतेनें संक्षेपरूपानें व्याकरण शुद्धरीतीनें व परम ममतेनें लहान मुलाप्रमाणें पढविली, असें स्वतः नानासाहेबांनींच मला सांगितलें. व ही एकच गोष्ट बाबांचें हिंदुत्व व द्विजत्व निःशंकपणें प्रस्थापित करण्यास पुरेशी आहे असें मला वाटतें. तूर्त मासल्याकरतां बाबांनीं नानासाहेबांस गीतेंतील एका श्लोकाचा अर्थ विचारून त्यांस कसें कुंटित करून सोडिलें याबद्दल तूर्त नानासाहेबांनीं सांगितलेला त्यांचा स्वतःचा एकच अनुभव येथें देतों.

साधुसंत हे कोणत्याही कालीं निर्गुण सद्वस्तूचे साक्षात् मूर्तिमंत सगुणावतार. परंतु प्राचीन कालापासून सुद्धां त्यांच्या अमृतमयी भक्तिरसाचा यथेच्छ आस्वाद घेणाऱ्या भक्तवृंदांत अज्ञानी अविद्वान् अतएव मूढ गणल्या जाणाऱ्या स्त्रीपुरुषांचाच भरणा जास्त. शास्त्री पंडितादि विद्वानांत गणल्या जाणाऱ्या लोकांची संख्या तर त्यांच्या भक्तगणांत बोटावर मोजण्या इतकीही नाहीं. इतकेंच नव्हे पण या संताळ्यांनीं जग बुडविलें असें म्हणणाऱ्या पंडितंमन्यांचीच संख्या विशेष. परंतु अलीकडे तो मनु पालटल्यासारखा दिसतो. व पुष्कळशा आधुनिक शास्त्रीमंडित व आंग्लविद्याविशारद पदवीधरांचें लक्ष साधुसंतांच्या निरुपम भक्तिरसामृताकडे वेधून राहिलेलें दिसतें ही परमानंदाची व नितांत समाधानाची गोष्ट आहे.

बाबांचे जे कांहीं असंख्य भक्त होते व आहेत त्यापैकीं कै. श्रीयुत नानासाहेब चांदोरकर हे पहिलेच पदवीधर भक्त होत. नानासाहेब बी. ए. होते. संस्कृत त्यांचा आवडता विषय होता. वेदांताची त्यांना फार गोडी. व त्या विषयावर त्यांनीं चांगलेच परिश्रम करून त्याचें सतत वाचन ठेऊन त्यांनीं तो

ताजा राखला होता. त्यांचें नेहमीं श्री भगवद्गीता व उपनिषदें या संबंधानें मनन चाललें असे. त्यांना बाबांचें दर्शन कसें व केव्हां घडलें याबद्दलचा हकीकत पूर्वींच मी श्रीसाईलीलेच्या ३ वर्षाच्या ६ वे अंकांत दिली आहे. ती वाचकांचे स्मरणांत असेलच. नानासाहेब शांकरभाष्यावरून उपनिषदांचा अर्थ चांगला सांगत व त्यांस स्वतःच्या संस्कृत ज्ञानाचा थोडासा अभिमानही वाटे.

बाबा मुसलमान. मुसलमानांना संस्कृत कोठून येणार ही त्यांची प्रथमची भावना. कांहीं वर्षे बाबांच्याकडे जाऊं लागल्यावर व बाबांचा चांगलाच नाद लागल्यावर एक दिवशीं नानासाहेब शिरडीस गेले असतां एक संस्कृत श्लोक गुणगुणत गुणगुणत मशीदींत गेले, व बाबांचे चरण वंदन करून बाबांचे जवळ नेहमी प्रमाणें बसले. त्यावेळीं बाबा इतके प्रसिद्धीस आले नव्हते. त्यांचेकडे बाहेरची मंडळी क्वचितच येत असत. गांवांतील माणसेंही थोडींच येत असत. बहुतकरून बाबा मशीदींत एकटेच असत. त्यावेळीं मशीद पडकी होती. बाबा एका गोणत्याच्या फाटक्या पत्कुरावर बसत असत. व आपण जसे एकमेकांशीं उघड स्पष्ट मनमुराद व येथेच्छ बोलतों तसेच ते नानासाहेबापाशीं येथेच्छ व मनमुराद बोलत.

बाबा म्हणाले, "नाना तूं काय गुणगुणतो आहेस." नानासाहेब म्हणाले, मी एक संस्कृत श्लोक म्हणत आहें. बाबा म्हणाले. "कसला श्लोक" नानासाहेब म्हणाले भगवद्गीतेंतील श्लोक आहे. बाबा म्हणाले तो मोठ्यानें म्हण. नानासाहेबांना या बाबांच्या सांगण्याचें फारच आश्चर्य वाटूं लागलें. तें मनांत विचार करूं लागले कीं बाबा मुसलमान. यांना संस्कृताचा गंध नाहीं. असें असतां मी गुणगुणत असलेला संस्कृत श्लोक काय आहे, कसला आहे वगैरे चौकशी करून तो मोठ्यानें म्हणण्यास मला सांगण्याचा आग्रह कां? पूर्वीं जरी वेळोवेळीं नानासाहेबांस बाबांचे बरेचसे अनुभव आले होते तरी त्यांच्या सर्वज्ञतेबद्दल व पूर्णब्रह्मत्वाबद्दल त्यांची पुरी खात्री एकदम पटावी कशी ?

बाबा मुसलमान, बाबा हिंदु, बाबा पारशी, ख्रिश्चन, बाबा सर्वच. ही गोष्ट यद्यपि सत्य तरी क्षीरसागराच्या पोटांत ज्याप्रमाणें जगांतील अनंत नदीनात्यांचा व अमोल संपत्तीचा समावेश झालेला असतो त्याप्रमाणें मानुषतनु धारण करणाऱ्या बाबांचे ठिकाणीही सर्व जातींचा, वर्णाश्रम धर्मांचा व सर्व ज्ञानजाताचा समावेश झाला असला पाहिजे ही उच्चतम कल्पना अज्ञानी जीवांच्या मस्तकांत एकदम शिरावी कशी? बाबा सद्गुण रत्नाकार, बाबा सद्गुणखाण, बाबा सद्गुणभांडार असें असूनही त्या त्या गुणांचा पारखी व अनुभवी भक्तराज पुढें येऊन ते गुण तो जगाचे निदर्शनास पटवून देईपर्यंत बाबा वेडे अशीच समजूत कोणाही अज्ञानी मनुष्याची होणार. साधुसंतांचें ज्ञान व चातुर्य चवाठ्यावर पडलेलें नसतें. आपला बोलबाला व्हावा, आपली प्रतिष्ठा वाढावी आपली कीर्ति दिगंतरांत पसरावी या हेतूनें ते आपल्या सर्वज्ञतेचें प्रदर्शन केव्हांच करीत नाहींत. त्यांना मान व आदर अति दुःसह होतात. श्रीमद्भगवद्गीतेंतील १३ वे अध्यायांतील "अमानित्वं अदंभित्वं" आदीकरून ७ वे श्लोकापासून ११ वे श्लोकापर्यंत जी ज्ञान्याचीं १८ लक्षणें दिली आहेत तीं सर्व तंतोतंत अक्षरशः त्यांचें ठिकाणीं निसर्गतःच तयार असतात. मग बाबा तर या १८ लक्षणांची, स्थितप्रज्ञतेची व गुणातीततेची प्रत्यक्ष मूर्ति असतां त्यांस संस्कृत काय कळणार असा संशय कां यावा? पण मानव प्राणी कितीही भाषा शिकला व त्यानें कितीही पदव्या धारण केल्या तरी त्यास त्याच्या अल्प विद्वत्तेच्या जोरावर सगुण परमात्म्याच्या सर्वज्ञतेची कल्पना येणें कठीण.

असो बाबांचा आग्रह पाहून नानासाहेबांनीं तो श्लोक म्हटला.

"तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया। उपदेक्ष्यंतितेज्ञानं ज्ञानिनस्तत्वदर्शिनः॥

श्री. भ. गी. अ. ४ श्लोक ३४.

बाबा म्हणाले, "नाना तुला याचा अर्थ कळला काय?" नानासाहेब म्हणाले होय. बाबा म्हणाले, कळला असेल तर मला सांग. नानासाहेबांस हें कोड्यें

उकलेना. आपण बी. ए. आहों, संस्कृत आपला आवडता विषय. त्यांत संस्कृत वेदांताचें आपण चांगलें परिशीलन केलें आहे. ह्या श्लोकाचा अर्थ तर अगदी सोपा आहे. यांत न कळण्यासारखें विशेष काय आहे. मग तुला अर्थ कळला असेल तर मला सांग. ज्यांना संस्कृत मुळींच येत नाहीं असे बाबा मला कां म्हणतात? असे कुतर्क नानासाहेबांचे मनांत पुनः पुनः पुनः पुनः येऊं लागले. अभिमान नष्ट झाल्याशिवाय परमात्म्याच्या सर्वज्ञतेची, खऱ्या सत्तेची, खऱ्या ऐश्वर्याची, खऱ्या सामर्थ्याची खूण पटत नसते. या ठिकाणीं बाबांना नानासाहेबांस तर ती ओळख पटवून देऊन त्यांस सद्भक्तचूडामणी बनवावयाचें होतें. परंतु गुरुमायेची ही अघटित करणी नानासाहेबांस सकृतदर्शनींच कळणार कशी? सरतेशेवटीं बाबांची आज्ञा व आग्रह म्हणून नानासाहेब त्या श्लोकाचा अर्थ सांगूं लागले. "साष्टांग नमस्कार करून, प्रश्न विचारून व सेवा करून तें ज्ञान म्हणजे काय हें समजून घे. नंतर तुला ज्यांना सद्वस्तूंचें यथार्थ ज्ञान झालें आहे असे ज्ञानीपुरुष त्या ज्ञानाचा उपदेश करतील." बाबा म्हणाले नाना, मला असा गोळाबेरीज अर्थ नको. प्रत्येक पदाचा अर्थ व्याकरणासह सांग. नानासाहेब त्याप्रमाणें सांगूं लागले. बाबा म्हणाले, नाना, नुसता साष्टांग नमस्कार केल्यानें कार्यभाग होतो कां? नानासाहेब म्हणाले, मला यापेक्षां प्रणिपात याचा दुसरा अर्थ माहित नाहीं. बाबा म्हणाले परिप्रश्न म्हणजे काय? नानासाहेब म्हणाले प्रश्न विचारणें. बाबा म्हणाले, प्रश्न व परिप्रश्न या दोन्ही शब्दांचा जर अर्थ एकच असेल तर व्यासांनीं परि हा उपसर्ग कां लावला? व्यास वेडे का होते? नानासाहेब म्हणाले, मला परिप्रश्न याचा दुसरा अर्थ माहीत नाहीं. बाबा म्हणाले सेवा म्हणजे कशी? नानासाहेब म्हणाले, आपण नेहमीं करतो तशी. बाबा म्हणाले अशी सेवा केली म्हणजे भागतें कां? नानासाहेब म्हणाले, मला यापेक्षां सेवेचा जास्त अर्थ माहीत नाहीं. बाबा म्हणाले बरें "उपदेक्ष्यंति ते ज्ञानं" यांतील 'ते' या पदापुढें जें "ज्ञानं" म्हणून पद आहे. त्याच "ज्ञानं" या पदाऐवजीं तेथें दुसरें कांहीं पद निघतें का? नानासाहेब म्हणाले, होय. निघतें. बाबा म्हणाले तें काय? नानासाहेब म्हणाले, "अज्ञानं" बाबा म्हणाले मग

" अज्ञानं " हें पद घेऊन अर्थ लागतो का ? नानासाहेब म्हणाले नाहीं व तसा अर्थ श्रीशंकराचार्यांनीं आपल्या गीताभाष्यांत केला नाहीं. बाबा म्हणाले होय. त्यांनीं केला नसेल पण तें पद घेऊन जर ज्ञानं या पदा पेक्षां जास्त व्यवस्थित अर्थ निघत असेल तर तो घेण्यास कांहीं हरकत आहे का ? नानासाहेब म्हणाले नाहीं. पण अज्ञानं हें पद घेऊन अर्थच कसा करावा हें मला समजत नाहीं. बाबा म्हणाले प्रणिपात, परिप्रश्न व सेवा झाल्यानंतर ज्ञानाचा उपदेश करण्यासाठीं श्रीकृष्ण परमात्मांनीं अर्जुनास तत्व-दर्शी ज्ञानी लोकांकडे कां बोट दाखविलें—श्रीकृष्ण स्वतः तत्वदर्शी व ज्ञान नव्हते कीं काय ? नानासाहेब म्हणाले होते. पण त्यांनीं असें कां सांगितलें तें मला समजत नाहीं. बाबा म्हणाले नाना तुला असाच कां अर्थ कळला ? नानासाहेब कुंठित झाले. व आपल्याला त्या श्लोकाचा खरा अर्थ कांहीं कळला नाहीं अशी गलिताभिमान होऊन त्यांनीं बाबांजवळ कबुली दिली.

बाबा म्हणाले नुसता साष्टांग नमस्कार करून नव्हे तर त्या ज्ञानी व तत्वदर्शी सद्गुरूंना सर्वस्वी शरण जाऊन ( सर्वस्वी शरण कसें जावें याबद्दल श्री ज्ञानेश्वर महाराजांनीं ज्ञानेश्वरीचे १८ अध्यायांतील ६६ श्लोक भाष्यांत फारच बहारीचें वर्णन केलें आहे ) कुत्सित बुद्धीनें, छळक बुद्धीनें अथवा केवळ चौकसबुद्धीनें नव्हे तर निवळ परमार्थ किंवा मुमुक्षुत्व बुद्धीनें त्यांस प्रसन्न करून घेऊन त्यांची मर्जी पाहून त्यांना निरनिराळे प्रश्न करून ( प्रश्नोपनिषदांत ६ शिष्यांनीं ६ प्रश्न केले आहेत. ते परिप्रश्न आहेत ते पहावे ) व आपल्या शरीरावर आपलें कोणत्याही प्रकारचें प्रभुत्व किंवा मालकी नाहीं व आपल्या शरीराचा अंतर्बाह्य जिवंतपणा केवळ त्यांच्या सेवेकरतांच आहे या भावनेनें त्यांची सेवा करून पूर्वीचे श्लोकांत वर्णन केलेलें ज्ञान काय आहे तें समजावून घे व नंतर ते सद्गुरु तुला तुझें अज्ञान कोठें आहे व त्याचा नाश कसा होईल त्याचा उपदेश करतील.

अर्जुनास काय शंका आली आहे व अर्जुन कसल्या बुचकळ्यांत पड-ला आहे हें मनांत अगोदरच जाणून जसे श्रीकृष्णपरमात्मा त्यास सूचक

प्रश्न करीत तसाच प्रकार बाबांचा नानासाहेबांबद्दल होता. म्हणूनच नानासाहेबांस बाबांनी त्या श्लोकाच्या पदापदाचा व्याकरण रीत्या अर्थ सांगण्यास सांगून त्यांस प्रश्न विचारून आपणास खरा अर्थ कळला नाहीं असें त्यांच्याकडून वदवून घेतलें. परंतु नानासाहेबांस बाबांनीं "अज्ञानं" हें पद काढून जो अर्थ सांगितला तो पटला नाहीं. ते म्हणत आचार्यांनीं तसें पद कां काढिलें नाहीं व तसा अर्थ कां केला नाहीं. बाबा म्हणाले, आचार्यांनीं तसा अर्थ कां केला नाहीं हा येथें मुख्य प्रश्न नाहीं. अज्ञानं हें पद निघतें कां नाहीं व निघत असेल तर तें पद घेऊन अर्थ जास्त सयुक्तिक दिसतो कां नाहीं हा मुख्य प्रश्न आहे. नानासाहेब म्हणाले, अज्ञानं पद निघतें याबद्दल वादच नाहीं. परंतु अज्ञानाचा उपदेश करणें ही गोष्ट मात्र चमत्कारिक व अश्रुतपूर्व दिसते. बाबा म्हणाले, ज्ञानाचा उपदेश कसा करावयाचा. अज्ञान घालविणें हेंच ज्ञान. मग "अज्ञान निमाल्या ! मी चि एकु असे धनंजया । सनिद्र स्वप्न गेलिया ! आपणपें जैसें ॥" श्रीज्ञानेश्वरी अ. १८ श्लोक ६६ ओंवी ८७. " तैंचि अज्ञान जैं समूळ तुटे । तै भ्रांतीचें मसैरें फिटे । अ. ५ श्लो. १६ श्रीज्ञानेश्वरी भाष्य ओंवी ८३ अज्ञान नाशा पेक्षां ज्ञान म्हणून आणखी कांहीं निराळी स्वतंत्र वस्तू आहे कीं काय ? तिमिर नाश म्हणजेच प्रकाश. द्वैतनाश म्हणजेच अद्वैत. म्हणजे ज्या ज्या वेळीं प्रकाशाबद्दल सांगावयाचें असतें त्या त्या वेळीं तिमिर नाशाबद्दलच सांगण्यांत येतें. ज्या वेळीं आपणास अद्वैताबद्दल बोलावयाचें असतें त्यावेळीं आपण द्वैतनाशाबद्दलच बोलतों. अद्वैत सांगावयाचें नसतें. तें अनुभवानें कळावयाचें असतें व आपल्या ठिकाणी ज्या द्वैत कल्पना किंवा भावना असतात त्यांचा नाश झाला म्हणजेच अद्वैत अनुभवास येतें. द्वैत सृष्टींत उभे राहून अद्वैत कोणाला सांगतां येणार व तें कोणी सांगितलें तर अद्वैत सृष्टींत गेल्यावांचून कोणाला कळणार किंवा कोणाचे अनुभवास, येणार ? जसे सद्गुरू ज्ञानमूर्ती आहेत तसाच शिष्यही मूळचा ज्ञानमूर्तीच आहे. परंतु उभयतां मधील फरक फक्त उत्कट भावनेंत, अत्युच्च अनुभवांत अलौकिक सत्तेंत व अप्रतिम सामर्थ्यांत व ऐश्वर्ययोगांत आहे. सद्गुरू हे

निर्गुण सच्चिदानंद आहेत. व जगदोद्धारार्थ सगुणावतार मानव तनूंत आल्यावरही त्यांच्या निर्गुणत्वाचा लेशभरही लोप न होतां ती सत्ता, तें ऐश्वर्य, तें सामर्थ्य व तें ज्ञान पूर्वीप्रमाणें त्यांचे ठिकाणीं परिपूर्ण व कायम असतें. शिष्यही तत्वतः त्याच स्वरूपाचा असतो; परंतु अनंत जन्मांच्या विपरीत संस्कारजन्य अज्ञानामुळें मी शुद्ध चैतन्य आहे ही भावना पूर्णपणें नष्ट होऊन "अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यंति जंतवः" श्री. गी. अ. ५ श्लो. १५ या श्लोकार्धांत सांगितल्याप्रमाणें मी जीव, मी दीन, मी दरिद्री अशा प्रकारची भावना त्याचे ठिकाणीं उत्पन्न होते. सद्गुरूस त्याच्या ह्याच अज्ञानमूलक भावनेचा नाश करण्याचा उपदेश करावयाचा असतो. मी जीव, मी दीन, मी दरिद्री या अनंत जन्मींच्या दृढ भावनेस कवटाळून बसलेल्या शिष्यास, तूं शिव आहेस, तुं श्रीमान् आहेस, तूं प्रभू आहेस असा नुसता शेकडों जन्म उपदेश करून त्याचे अंतःकरणांत काय प्रकाश पडणार आहे व त्यास त्याचे मूळ स्वरूपाची काय जाणीव उत्पन्न होणार आहे व त्यास ती सत्ता, तें ऐश्वर्य, व तें ज्ञान काय प्राप्त होणार? त्या सत्तेची, त्या ऐश्वर्याची व त्या ज्ञानाची काय अनुभवजन्य जाणीव उत्पन्न होणार आहे. किंवा आपण खरोखरच शिव आहों अशी थोडीच ओळख पटणार आहे. देह म्हणजेच मी व मी म्हणजेच जीव किंवा आत्मा. माझ्यापासून परमात्मा निराळा. परमात्मा, मी व जग हीं तिन्हीं एकमेकांपासून वस्तुतः अगदीं भिन्न हीच शिष्याची निरंतरची अज्ञानमूलक भ्रामक भावना व हीच त्याची असंख्य जन्म होत असलेली चूक. याच भावनेस व चुकीस बळी पडून तो करीत असलेले व्यापार किंवा कर्में व याच कर्मानुसार त्यास मिळत असलेली इष्टानिष्ट व मिश्र ( सुख दुःख व सुखदुःखमिश्रित ) फलें व याच फलानुसार त्याचे ठिकाणी झालेली सुखदुःखाची भावना. या भावनेस व चुकीस कारणीभूत असलेलें मूळ अज्ञान त्याचा नाश करणें म्हणजे अज्ञान कोठें व कसें उत्पन्न झालेलें आहे, चूक कोठें व कशी झाली आहे, हें दाखविणें ह्याचेंच नांव गुरूंनीं शिष्यास उपदेश करणें. मी जीव आहे, शरीर म्हणजेच आत्मा आहे, व परमात्मा व

विश्व भिन्न आहेत, असें मानणें हें जसें अज्ञान आहे, तसेंच मी शिव नाहीं असें मानणें किंवा शरीर म्हणजे आत्मा नव्हे असें न मानणें व परमात्मा व विश्व एक आहेत असेंही न मानणें हेंही अज्ञान आहे. हें अज्ञान व ही चूक त्यास दाखविल्या वाचून तत्वतः तो कोण, शरीर, जीव शिव आत्मा परमात्मा व जग कोण व यांचा परस्पर संबंध काय हीं सर्व भिन्न कीं एकच, हें त्यास कळणें दुर्घट. अशा तऱ्हेनें शिष्याचें अज्ञान व चूक त्यास दाखवून त्याचें अज्ञान घालविणें व त्याची समजूत करून देणें. हा उपदेश कशाचा ज्ञानाचा का अज्ञान घालविण्याचा ? ज्ञानमूर्तीस ज्ञानाचा काय उपदेश करावयाचा त्याचें अज्ञान कोणतें तें दाखवून त्याचा नाश करावयाचा हाच तो उपदेश. याप्रमाणें बाबांनीं अज्ञान पद घेऊन अर्थ कसा सुव्यवस्थित लागतो हें नानासाहेबांस सांगितलें. व संतांस सर्वस्वी शरण जाऊन त्यांना मुमुक्षुत्वबुद्धीनें प्रश्न विचारून व त्यांची कायावाचामनेंकरून सेवा करून त्यांना प्रसन्न करून घेतल्यावर ते ज्ञानी तत्वदर्शी संत सद्गुरू तुला उपदेश करतील असें श्रीकृष्ण अर्जुनास कां सांगतात ? ते स्वतः ज्ञानी तत्वदर्शी जगद्गुरू होते व त्यांच्यासारखे अद्वितीय व अनुपमेय सद्गुरू अर्जुनाच्याही अतुल भाग्यानें त्यास प्राप्त झाले असतां अर्जुनानें तरी ही गोष्ट निमूटपणें कां कबूल करावी व देवा आपल्यासारखे अमोल सद्गुरू मजजवळ असतां माझें अज्ञान घालविण्याचा उपदेश करण्याचें कार्य आपण तिसऱ्यास कां सांगतां ? आपण कांहीं इतर साधुसंत सद्गुरूपेक्षां कमी दर्जाचे आहां कीं काय ? वगैरे प्रश्न देवास कां विचारूं नयेत, हा मुद्दा राहिला. बाबा म्हणाले, सद्भक्त जसे श्रीकृष्णास देव मानतात तसेच " वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः " ( भ. गी. अ. ७ श्लोक १९ ) अशा कोटींतील ज्ञानी व तत्वदर्शी भक्तांस श्रीकृष्ण आपले देवच मानतात. श्रीकृष्ण अशा भक्तांस आपला प्राण, आपला आत्मा मानतात. ( ज्ञानेश्वरी अ. १२ श्लो. ७, व १९ वरील भाष्य ) श्रीकृष्णास अर्जुनाच्या अज्ञान नाशाचा उपदेश करतां येत नव्हता असें नाहीं किंवा तो

करण्यास ते कोणत्याही प्रकारें अयोग्य होतें असेंही नाहीं. परंतु आपण ज्यांना देव मानतों अशा तोलाचे व योग्यतेचे अधिकारी सद्गुरु जगांत असून श्रीकृष्ण परमात्मा प्रत्येक ठिकाणी हें काम जर स्वतःच करूं लागले तर जगांत अशा भक्तांचा महिमा कधींही वाढणार नाहीं. म्हणून हें पुण्य व गोड कामगिरी ज्ञानी व तत्वदर्शी संत करतील असें अर्जुनास श्रीकृष्णांनी सांगितलें.

आतां येथें अशी एक शंका निघेल कीं हें अज्ञानं पद खरोखर त्या श्लोकांतून बाबांनीं काढिलें आहे का आपल्या संस्कृत ज्ञानाची घमेंड मारण्यासाठीं नानासाहेबांनीं स्वतःच काढून तें बाबांच्या तोंडांत घातलें आहे व त्याचे समर्थनार्थ हें इतकें भाष्य रचलें आहे. आचार्यांस असें पद निघतें हें माहीत नव्हतें काय. व माहीत असेल तर त्यांनीं तसा अर्थ कां केला नाहीं ? नानासाहेबांनीं हीं शंका प्रथमच घेतली होती हें वर सांगितलेंच आहे.

मला वाटतें ही शंका निर्मूल आहे. प्रथमतः यांत घमेंड मारण्यासारखें कांहींच नाहीं. त्या श्लोकांतून जर तसें पद निघतच नसतें व तें ओढाताण करून किंवा दूरान्वय करून काढावें लागलें असतें तर गोष्ट निराळी. पण तें पद येथें सहजरीत्या निघतें आहे. व ही गोष्ट नानासाहेबांचे लक्षांत पूर्वींच आली असती तर मी या श्लोकांतून ज्ञानंचे ऐवजीं अज्ञानं पद काढतों व त्याचा अर्थ मी असा करतों असें म्हणण्यास कांहींच हरकत नव्हती. त्याकरतां तें पद बाबांच्याच मुखांत घालण्याचें कारण नव्हतें. व नानासाहेब निष्कारण असें करतील असें मला मुळींच वाटत नाहीं.

आतां बाबांनींच हें पद काढलें असेल तर आचार्यांनीं कां काढिलें नाहीं हा एक मुद्दा उरतो. आचार्य जगद्वंद्य आहेत. व त्यांच्या अतुल विद्वत्तेबद्दल, अलौकिक लेखनशैलीबद्दल गंगाजला प्रमाणें गंभीर व जोरदार वाक्प्रहाराबद्दल व अप्रतिम ओजस्वितेबद्दल कोणाचाच वाद नाहीं. परंतु प्रत्येक श्लोकाचे जितके अर्थ होत असतील तितके त्यांनीं दिलेच पाहिजेत असें नाहीं, किंवा त्यांनीं दिलेल्या अर्थापेक्षा दुसरा अर्थ त्यांतून निघतच

नाहीं असेंही नाहीं. एकाच श्लोकांतून निरनिराळीं पदें काढून किंवा एका शब्दाचे निरनिराळे अर्थ काढून सबंध श्लोकाचा एक निराळाच अर्थ करणें ही पंडितजनांच्या बुद्धिकौशल्याची एकप्रकारची लीलाच आहे व तसें जर नसतें तर आद्य शंकराचार्यांच्या मागून रामानुजाचार्य, मध्वाचार्य, वल्लभाचार्य आदीकरून जेवढे आचार्य झाले त्यांनीं त्याच भगवद्गीतेचे द्वैतपर, विशिष्टाद्वैतपर, भक्तिपर असे निरनिराळे अर्थ करतां आले नसते. त्याच प्रमाणें प्रसिद्ध वामत पंडित, आनंदगिरी वगैरे संस्कृत पंडितांनीं त्याच भगवद्गीतेवर निरनिराळ्या अर्थाच्या टीका केल्या आहेत. त्याचप्रमाणें संतचूडामणी ज्ञानेश्वरादि साधुसंतांनींही आपल्या मराठी ग्रंथांत गीतेचे अर्थ आचार्यांपेक्षां कांहीं ठिकाणीं भिन्न भिन्न केलेले आहेत. व त्या नंतर अगदीं अलीकडे म्हणजे लोकमान्यांनीं आपल्या गीतारहस्यांत तर भक्तिज्ञानसमन्वित कर्म प्रधानपर त्याच गीतेचा अर्थ लावला आहे. आतां उपरिनिर्दिष्ट सर्व मंडळी परमपूज्य व महापंडित होती व त्यांचा अर्थ मान्य करणारे त्यांचे अनुयायीही विद्वान व पंडित होते व आहेत याबद्दलही वाद नाहीं. यावरून इतकेंच सिद्ध होतें कीं हे सर्व अर्थ गीतेंत संभवनीय होते म्हणूनच त्यांना करतां आले व तसेच आणखीही कितीक असतील व तेही करणारे पुढें कितीक पंडीत जगतीतलावर अवतीर्ण होतील.

अर्थ कोणता खरा किंवा सयुक्तिक हा प्रश्न निराळा. पण मुख्य मुद्याचा प्रश्न हा कीं उपरिनिर्दिष्ट संस्कृत व मराठी आचार्य पंडित व टीकाकारांनीं केलेले भिन्न भिन्न अर्थ एकाच भगवद्गीतेच्या ठिकाणीं संभवतात कीं नाहीं, व जर संभवतात तर "तद्विद्धि प्रणिपातेन" या श्लोकांतून बाबांनीं अज्ञानं हें पद काढून त्याचा सयुक्तिक अर्थ काढला तर त्यांत वावगें काय झालें ! कोणास कोणता अर्थ रुचेल हाही प्रश्न निराळा. ज्यास जो रुचेल तो त्यानें ग्रहण करावा. परंतु न रुचणाऱ्या अर्थाबद्दल अनादर व असहिष्णुता बाळगूं नये व प्रगट करूं नये इतकेंच.

असो. वरील विवेचनावरून कोणाही निःपक्षपाती विद्वान मनुष्यास कळून येईल कीं अज्ञानं हें पद नानासाहेबांचें नव्हे. तें बाबांचेंच आहे. बाबा संस्कृत पंडित होते. त्यांनीं सर्व गीता नानासाहेबांस संक्षेपरूपानें पण व्याकरणरीत्या शिकविली. याबद्दलची विस्तृत हकीकत मी पुढें स्वतंत्रपणें लिहिणार आहे. आतां फक्त बाबांचे लौकिकी हिंदुत्व, द्विजत्व व परिव्राजकत्व प्रस्थापित करण्याकरितां नानासाहेबांचा गीताश्लोकाबद्दलचा विशेष लक्षांत ठेवण्यासारखा सुंदर अनुभव दिला आहे. या सर्व विवेचनावरून बाबा मुसलमान नव्हते ते हिंदु होते असेंच दिसून येईल.

हजारों वर्षे त्या चरणांतून ज्ञानं हें पद काढण्याची डोळ्यास संवय व त्याचप्रमाणें आचार्यभाषा ऐकण्याची कानास संवय असल्यामुळें बाबांनीं काढिलेलें किंवा सुचविलेलें अज्ञानं हें पद सकृद्दर्शनीं गीतेचा अर्थ करणाऱ्याचा कोणत्याही संस्कृतज्ञास, कसेंसेंच लागेल व ते आपलें तोंड जरा अंबट करून नानासाहेबांस कदाचित दोष देतील व अज्ञानाचा उपदेश करणारे गुरू आम्ही कधीं पाहिलेही नाहींत व ऐकलेही नाहींत. असें म्हणतील. परंतु " ज्ञानोपदेश " या शब्दांत तरी " अज्ञाननाशोपदेश " हाच अर्थ भरलेला आहे. मग त्या चरणांतून " अज्ञानं " हें पद काढून तुला ज्ञानी व तत्त्वदर्शी संत तुझें अज्ञान कोठें आहे तें सांगतील किंवा दाखवितील असा अर्थ केल्यास त्यांत बिचकण्यासारखें काय आहे ?

असो. वरील विवेचनावरून कोणाही निःपक्षपाती वाचकास कळून येईल कीं, " अज्ञानं " हें पद बाबांचें आहे नानासाहेबांचें नाहीं.

बाबांची नेहमीची वागणूक मात्र ते हिंदु होते कां यवन होते हे चटकन लक्षांत न येण्यासारखी व पुष्कळच गुंतागुंतीची होती. परंतु यवन हिंदु तुलनात्मक वर जीं कांहीं कारणें दिलीं आहेत त्यापैकीं निदान बाबांचा सुंता अभाव, कर्णवेधत्व, नारायण नामोच्चार सातत्य मशीदींत निरंतर ठेविलेला

धुनी व नानासाहेबांस भगवद्गीताध्यापन येवढीं कारणें तरी बाबांचें लौकिकी हिंदुत्व, द्विजत्व, व परिव्राजकत्व प्रस्थापित करण्यास पुरेशीं आहेत असें मला वाटतें. आतां ही सर्व माहिती फक्त नानासाहेबांच्या मुखांतूनच मला मिळालेली आहे. अतएव ती एकदेशी आहे. इतर भक्तांपैकीं कोणीही इतक्या तऱ्हेनें सूक्ष्म निरीक्षण केल्याचें ऐकिवांत नाहीं. आपले आईबाप कोण, आपण कोठून आलांत, आपला मूळगांव कोण वगैरे प्रश्न पुष्कळ भक्त बाबांस विचारीत, परंतु फार झालें तर आम्ही नौरंगाबादेहून आलों. तेथें मी मामाचे घरीं होतों. त्या मामाचें नांव नसऱ्या वगैरे वगैरे बाबा सांगत. त्यामुळें त्यांच्या जातीचा व वर्णाचा पत्ता लागत नसे.

शिरडीचे रहिवासी व बाबांचे भक्त श्रीयुत रा. रा. तात्या पाटील कोते यांची वृद्ध मातुश्री बाबा शिरडींत आल्यापासून त्यांना अन्न खाऊं घातल्याबाचून आपण अन्न ग्रहण करीत नसत. बाबा जंगलांत अगर इतरत्र असतील तेथून कितीही उशीर झाला तरी त्यांस धुंडाळून आणून त्यांना भाकरी खावयास घालून नंतर स्वतः अन्न गृहण करीत. असें ऐकिवांत आहे. त्याच प्रमाणें बाबा रोज सकाळीं जी ओली भिक्षा मागत ती हिंदुंचेच घरीं मागत व तीच खात. तसेंच तिसरे प्रहरीं त्यांच्याकरिता एक वृद्धबाई दूध व भाकरी घेऊन येत असे तीही हिंदूच असे. बाबांस दररोज जे नैवेद्य येत तेही हिंदूकडूनच येत. त्यापैकीं कोणताही नैवेद्य मुसलमानाकडून येत नसे. ह्याही सर्व गोष्टीवरून बाबा हिंदूच होते असें वाटतें.

वरील सर्व कारणापेक्षां नानासाहेबांनीं दिलेलीं कारणें मला विशेष समर्पक वाटतात. नानासाहेबांवर अविश्वास ठेवण्याचें मला कांहींच कारण दिसत नाहीं. साधु सर्वच जातींत असतात व ते कोणत्याही जातींत जन्मास आले तरी ते नेहमी सर्वांस सारखेच पूज्य. ही गोष्ट नानासाहेबांस माहीत नव्हती असें नाहीं. असें असूनही ते बाबांच्या हिंदुत्व, द्विजत्व व परिव्राजक-

त्याबद्दल केवळ असत्यावलंबन करून लोकांचा निष्कारण गैरसमज करतील असें मानण्यास कोणतींच सबळ कारणें नाहींत. निदान तशीं कारणें पुढें येईपर्यंत तरी त्यांनीं सांगितलेल्या गोष्टी पूर्ण विश्वसनीय आहेत असें मी समजतों. यांत माझाही कोणत्याच गोष्टीबद्दल दुराग्रह नाहीं, वाद नाहीं. जें माहीत होतें ते अल्प समजुतीप्रमाणें सहृदयवाचक भक्तांपुढें मांडलें आहे. बाबा हिंदु असले काय किंवा यवन असले काय ते सर्वतोपरी वंदनीयच होते. यांत ते हिंदुच असले तरी त्यांच्या यवन भक्तांस वाईट वाटण्याचें कांहींच कारण नाहीं व ते यवन असल्यास त्यांच्या हिंदु भक्तांनाही खेद करण्याचें कारण नाहीं व तसा कोणीही हिंदु अगर यवन भक्त खेद करीतही नाहीं.

"चातुर्वर्ण्यं मयासृष्टं गुणकर्म विभागशः" असें भगवंतांनींच भगवद्गीतेच्या ४ अ. १३ श्लोकांत म्हटलें आहे. वास्तवीक हें वर्णन साधुसंतांकरतां नाहीं. तथापि मनुष्य स्वभावच असा आहे कीं तो साधुसंतांच्या जातीबद्दलही चौकशी करीत असतो. जात कळल्यामुळें त्याच्या त्यांच्या संबंधाच्या पूज्यभावनेंत लेशभरही फरक होत नाहीं. हा फक्त जिज्ञासेचा प्रश्न आहे. व त्या जिज्ञासेला धरून बाबांच्या हिंदुयवनत्वाबद्दल आज थोडी चर्चा केली आहे. कोणाही भक्ताचा बुद्धिभेद किंवा हृदयछेद करण्याचा यांत बिलकूल हेतु नाहीं. लौकिकी कां होईना पण सत्य निदर्शनास यावें येवढाच हेतु, व येवढीच जिज्ञासा. सहृदय वाचकभक्तांनीं याचा शांत मनानें विचार करावा व त्यांचेजवळ वरील गोष्टीस दुसरीं कांहीं साधकबाधक प्रमाणें असतील तर तीं त्यांनीं शिरोलिखित विषयावर चांगला प्रकाश पडेल अशा सद्धेतूनें श्री साईलीलाद्वारें प्रसिद्ध करावीं अशी माझी त्या सर्वांस नम्र विनंति आहे.

## द्रुतविलंबित.

परम शंकर[1] शंकर[2] सार हो। रुचिर श्रीगुरु[3] श्रीगुरु[4] माइ हो। -
मधुर सद्गति[5] सद्गति[6] दायि हो। नमन श्रीधरें[7] श्रीधरें[8] पायिं हो॥

त्यांच्या पुण्य प्रेरणेनें वरील विचार व अनुभव लिहिण्याची स्फूर्ती झाली त्याच श्री महेश्वर गुरुमाउली बाबांच्या दिव्य पदपुष्करावर ते विचार तो अनुभव व शेवटची कवितारूपी वाक्त्रिदलबिल्वपत्र अनन्यभावानें व अति नम्रपणानें अर्पण करून आपली रजा घेतों.

ठाणें २३-२-२७

बाबांचें बाळ

---

१ कल्याण करणारे २ शिव ३ ज्ञानसंपत्ति व ऐश्वर्य देणारी ४ सद्गुरुमाउली ५ सत्यज्ञानरूप ६ कैवल्य, मोक्ष ७ लक्ष्मीला धारण करणारे ८ विष्णूरूप बाबा.

॥ श्री साइदत्तचिदेशायनमः ॥

श्री सद्गुरुसाईनाथ महाराज यांचे दयेपासून मला एक छोटासा अनुभव आला. तो असा:—कार्तिक महिन्याचे दिवस होते. निर्मळची यात्राही जवळच आली होती. तेव्हां अर्थातच आमचे "स्काऊट बंधू" आमच्या स्काऊट मास्तरांकडे "आपण निर्मळ येथें कॅम्प ठोकूं" असा एकच हट्ट घेऊन बसले होते. व मी सुद्धां "आमच्या स्काऊट मास्तरांना आम्हांस निर्मळास नेण्याची बुद्धि द्या". अशी श्रीसाईनाथांकडे मोठ्या उत्साहानें प्रार्थना करीत होतों.

निर्मळची यात्रा अगदीं जवळ येऊन ठेपली; आमचा निर्मळ येथें कॅम्प ठोकण्याचा बेतही झाला. यात्रेच्या आदले दिवशीं संध्याकाळीं आम्हीं आमचा स्काऊटचा तो "अप्टुडेट् ड्रेस" धारण केला; व निर्मळ मुक्कामीं कॅम्प ठोकला. निर्मळ येथें तीन दिवस राहून तेथें ज्या कामासाठीं गेलों होतों तीं कामें संपविल्यानंतर आम्ही वसईस आलों. त्या तीन दिवसांत वर उल्लेख केलेल्या अप्टुडेट् ड्रेसास शोभायमान करणाऱ्या त्या नव्या कोऱ्या ठणठणीत बुटानें थोडासा दगा दिला. बूट लागल्यामुळें दोन्हीं पायांस बारीकसे दोन फोड आले.

निर्मळास आमचा मुक्काम तीन दिवसच होता, परंतु निर्मळाहून येतांना माझ्या बरोबर आलेले हे दोन पाहुणे मात्र माझे पायांवर बरेच दिवस मुक्काम ठोकून बसले होते. अतिथीसत्कारास अनुसरून मी त्यांचें आदरातिथ्य करण्यास विसरलों नाहीं. तें कांहीं असो. यजमानाच्या घरीं पाहुण्यानें सुद्धां आपला मान राखूनच राहिलें पाहिजे. नाहीं तर पहिले दिवशीं पाहुणा, दुसरे दिवशीं पै व पुढलें आपणास माहीत आहेच. नंतर तीन चार दिवसांनीं हे दोन फोड मोठे होत जाऊन मला जरी "क्षेत्रफळाची" अतीशय नावड असली तरी यांना त्याची फार आवड असल्यामुळें त्यांनीं माझे पायांवर आपलें क्षेत्रफळ वाढविण्यास सुरवात केली. बरोबरच आहे. "भटाला दिली ओसरी तर भट हात पाय पसरी" असल्या भटाला ओसरी द्यावीच कां?

चार दिवस निष्काळजीपणानें राहिल्याचा परिणाम. जेव्हांच्या तेव्हां औषधोपचार केला असता तर ? पण नाहीं; क्रियेचा कर्ता ईश्वरच असतो. श्रीसाईबाबांच्या उदीचा अनुभव यावयाचा होता म्हणूनच ही अशी बुद्धि झाली; अस्तु.

असा मात्र औषधोपचार करण्यास सुरवात झाली. पायतणाचें चांवडें जाळून तें कडू तेलांतून बरेच दिवस लाविलें तरी गुण नाहीं. शिपिचंदन व खोबरेल तेल वगैरे मिश्रित औषध चोपडण्यांत आलें. तरी कांहीं पत्ता नाहीं. अशीं आणखीं दोन तीन औषधें लाऊन पाहिलीं तरी थांग नाहीं; व नंतर एका उत्तमशा डॉक्टरांकडे जाऊन त्यांजकडून मलम आणिलें व तेंही लाऊन पाहिलें तरी ओंफस्. शेवटीं एक दिवस सुदैवानें श्री साईबाबांची उदी लावण्याची बुद्धि मला झाली. मी मलिन मलमानें माखविलेले माझे पाय दोन तीन वेळां स्वच्छ धुवून त्यांवर श्रीसद्गुरु साईबाबांची पवित्र उदी लाविली. काय चमत्कार सांगावा ? दुसरे दिवशीं सकाळीं पायांना चालीमुळें आलेली सूज व गरमपणा नाहींसा होऊन वर वर्णन केलेल्या सन्माननीय प्राहुण्यांनीं दोन तीन दिवसांतच आपला पायांवरील मुक्काम उठविला.

वसई ता. १४-१-२७

वसई हायस्कुलमधील एक स्काऊट.

॥ श्रीसद्गुरु साईनाथायनमः ॥

## स्त्रग्धरा

माझे साई दयाळू किति जरि स्तविले वर्णितां येत नाहीं ।
माझे बाबा कृपाळू कितितरि स्तवुं मी ? सांगतां येत नाहीं ॥
माझे साई दिनांचे अतिशय असती पाठिराखे सदैव ।
माझे बाबा असे जे नमन करितसे भक्त हा त्यां सदैव ॥

## हरिणी.

नमन करितों साईनाथा त्रिकालचि मी तुला ।
नमन करितां जें मी मागें प्रभो पुरवी मला ॥

करित असतों आशा ऐशी सदा शिशु हा तुझा ।
सतत असुदे देवासाई प्रसादचि; ना दुजा ॥

चामरवृत्त.

काम क्रोध लोभ माद मोह आणि मत्सर ।
नाहींसे करोनि; साइनाथ सौख्य या भर ॥
घालि आमुच्या; विनंति एवढीच रे प्रभो ।
काव्य अर्पितों तुझ्या पदींच हे पहा प्रभो ॥

व्ही. एल्. गव्हाणकर
वसई हायस्कुल, वसई. जि. ठाणें.

रा. रा. मॅनेजर साहेब साईलीला:—

श्रीसाईनाथबाबांच्या असंख्य भक्तांपैकीं बहुतेक असे सांपडतील कीं, त्यांना श्री समर्थांचा कांहीं तरी दृष्टांत होऊन ते साई माउलीच्या पाईं रत झाले आहेत. ह्या संसारांत ' खानापिना और सुखसे रेहना ' हेंच इति-कर्तव्य आहे असेंच समजणारांची दुर्दैवानें संख्या जास्त आहे. परंतु त्यापैकींही ज्यांचें पूर्वसंचित चांगलें त्यांना दृष्टांतरूपी गुळाचा खडा दाखवून गुरु-माउलीचे चरणीं निष्ठा बसवून श्री समर्थांनीं कित्येक भक्तांना तरणोपायाचा मार्ग दाखवून दिला आहे. मला आणि माझे पत्नीस साईबाबांनीं आमच्या घाबरलेल्या स्थितींत दृष्टांत देऊन कैकवेळां धीर देऊन संकट निवारण केलें व ते दृष्टांत साईलीलेच्या अंकांत देण्याचें बरेच दिवसांपासून मनांत घोळतही होतें. परंतु जगांतील बहुतेक लोक सत्याचा विपर्यास करणारेच दिसून येतात. बाबांचे आम्हांस असे दृष्टांत झाले होते असें जाहिर केलें कीं, " मोठे बाबांचे जाडे भक्त म्हणून बाबांनीं ह्यांना दृष्टांत दिले " इत्यादि टवाळ्यांस सुरवात होणार! तेव्हां जगाच्या कुचेष्टेस विनाकारण बळी पडण्यापेक्षां बाबांचे पाय बरे व आपण बरे, अशी माझी अल्प समजूत झाली होती. परंतु बराच विचार करून पाहतां ह्यांतही माझी चूकच होत आहे असें मला दिसून आलें. कारण कीं बाबांचे दृष्टांतरूपीं फुलांची माला बाबांनाच अर्पण करण्यांत

त्यांचे खऱ्या भक्तांच्या अंतःकरणांतील गुरुनिष्ठा दृढतरच होऊन त्यांना आनंद होईल. येऱ्या गबाळांना भिऊन ह्या सेवेस अंतरणें हितावह नाहीं. असा माझा निश्चय होऊन मी आपले सेवेसीं मला स्वतःस श्रीसाईबाबांनी कशा संकटसमयीं धांव घेऊन तारलें त्याचा थोडक्यांत उल्लेख करीत आहे.

सन १९१३ इ० त प्रपंचांतील अनेक फिकीरीमुळें माझें मनांत 'कसें होईल,' 'काय होईल' ह्याच मंत्रानें अहोरात्र ठाणें दिल्यानें मी दिवसेंदिवस खंगत चाललों. त्यावेळीं मला दरमहा रुपये पन्नास मिळत होता. परंतु प्रपंचांतील मंडळी जास्त असल्यानें उत्पन्नाचे मानानें खर्चास मेळ बसेना व त्यामुळें पुढें बालबच्च्यांचें कसें होईल हा हृद्रोग सारखा त्रास देऊं लागला व त्यामुळें मी इतका नाताकत झालों कीं, माझे दयाळू अधिकाऱ्यांना कींव येऊन त्यांनीं आग्रह करून रजा देऊन इंदूरसारख्या ठिकाणीं राहून औषधोपचार करण्याची मला कळकळीनें सल्ला दिली. ह्या त्यांच्या सहानुभूती-बद्दल मी त्यांचे आभार मानून बालबच्च्यांसह खरगोणहून इंदूरास गेलों व तेथें गरीबीच्या हालतींत हालखुशामत करूनच औषध घेऊं लागलों. परंतु माझें दुर्दैव त्यावेळीं हात धुवूनच माझे पाटीं लागलें होतें. एके दिवशीं मी बाजारांतून घरीं जात असतां एकाएकीं माकडहाडांतून अशी चमक निघाली कीं, एकही पाऊल पुढें टाकवेना. अखेर टांगा करून घरीं आलों. व हें विघ्न नवीनच काय उपस्थित झालें आहे ह्याचा विचार करूं लागलों. परंतु डॉक्टरसाहेबांशिवाय ह्या प्रश्नाचा उलगडा होणें शक्य नसल्यानें त्यांचे सेवेसीं मी अति काकुळतीनें सर्व प्रकार निवेदन केला. तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, त्या रोगास ' साय टिका ' म्हणतात. हा नाताकतीमुळें होतो. ह्यावर ॲस्पिरिन वगैरे देतात. कांहीं दिवसांनीं आराम होईल. ताबडतोब आराम होणार नाहीं. तेव्हां त्यांचे आज्ञेप्रमाणें ॲस्पिरिन, सोडा सालिसिलास इत्यादि औषधें घेऊं लागलों. परंतु त्या दुखण्याची विशेष तकलीफ अशी होऊं लागली कीं पायांतून कोणत्या ठिकाणाहून विजेसारखा झटका येई तेंच समजेना व त्यामुळें मला बसतां येईना अथवा उठून चालतांही येईना. अथवा कोणत्या तरी कुशीवर स्वस्थ पडतांही येईना. अहोरात्र विंचवाच्या दागिन्याप्रमाणें

चमक निघे व त्याचा परिणाम असा झाला कीं, माझें अन्न तुटलें व झोपेचें तर नांवच नाहीं. ह्या अवस्थेंत मी दीडदोन महिने काढले असतील. रोगाचें पाऊल मागें पडण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां साहजिकच जीविताविषयीं मी निराश झालों. व ह्याच सुमारास माझा वडील मुलगा चि. यशवंत हा म्यॅाट्रिकचे परीक्षेस बसणार होता. त्या बच्चाचें माझ्या आजारानुळें अभ्यासांत लक्ष लागेनासें झालें. तेव्हां माझें जें होणें असेल तें होवो, परंतु माझ्या सान्निध्यानें ह्या बच्चाचे अभ्यासांत व्यत्यय येणें हितावह नाहीं. असें जाणून मी असें ठरविलें कीं, लहान लहान बच्चे व बायकोस घेऊन सासुरवाडीस जावें. तेथील हवापाण्यानें कांहीं फरक होईलच. कदाचित वेडावांकडा प्रसंग आलाच तर निदान बायको व लहान लहान बालबच्चांना कांहीं दिवस तरी अडचण पडणार नाहीं. हा विचार मी ठरविला खरा. परंतु इंदूराहून हर्दा चोवीस तासांचा रेल्वेचा प्रवास असून त्यांतही खांडव्यास एक रेल बदलून दुसरींत बसावें लागतें. तेव्हां इतक्या लांबचे प्रवासास व त्यांतील धक्काधुक्कीस आपण समर्थ आहों काय ह्याची मला खरी खुरी कल्पनाच झाली नाहीं. व कांहीं होवो सासुरवाडीस म्हणजे हरद्याहून चार कोसावर जिजगांव म्हणून एक खेडें आहे तेथेंच जावें असें वाटूं लागलें व माझा विचार मी मुलासही कळविला. त्याचें वय त्यावेळीं सतरा अठरा वर्षांचेंच होतें. ह्यामुळें अशा अवस्थेंत इंदूराहून हरद्यापावेतों जाणें कसें होईल ह्याचा त्याला पुरा विचार करतां आला नाहीं व त्यानेंही माझे विचारास रुकारच दिला. खैर खांडव्यास मोठ्या लाइनींत जाऊन बसण्याचे प्रसंगीं मला अत्यंत तकलीफ पडली. असो. कसेंतरी करून मी एकदाचा हरद्यास पोचलों व तथून गाडी मार्गानें जिज-गांवास गेलों. तेथें माझे अत्यंत कळकळीचे नारायणदादा नांवाचे चुलत सासरे होते. त्यांचें प्रेम माझ्यावर अलोट होतें. त्यांनीं मला पाहिलें व मीही त्यांना नारायण दादा म्हणून हांक मारली व उभयतांचे अंतःकरणांत कालवा-कालव सुरू होऊन कांहीं मिनिटें वाचा फुटेना. परंतु नारायण दादानेंच मनाला आवरून मला घरीं नेलें व माझ्या स्थितीवरून मी पांचचार दिवसांचाच पाहुणा आहे असें त्यांना वाटून ते हताश होऊन कोणता उपाय करावा हें

त्यांना सुचेना. शेवटीं त्यांनीं एका डबींतून थोडीशी उदी घेतली व "बाबा आतां पोरीचें सौभाग्य कायम टेवणें तुझेच हातीं आहे." असें म्हणून माझ्या कपाळास ती लावली, व माझ्या खाटेजवळच बसून तुल्सीकृत रामायणाचा पाठ करीत बसले. येथें एवढें सांगणें जरूर आहे कीं माझे नारायणदादा श्री साईबाबांच्या असंख्य भक्तांपैकीं एक निःसीम भक्त होते व बाबांचेंही त्यांच्यावर अलोट प्रेम होतें. नारायणदादांनीं मला उदी लावून तासभर झाला असेल, इतक्यांत माझ्या समोर एक संन्यासी येऊन उभा राहिला व मला थोपटून म्हणूं लागला कीं, "तुला घाबरूं नको, तूं आजपासून तिसऱ्या दिवशीं बरा होशील." त्यावेळीं दोनप्रहरचा चाराचा सुमार होता. मी झोपेंत नव्हतों. व माझ्या समोर एक संन्यासी उभा असून त्यानें मला थोपटून तूं आजपासून तिसरे दिवशीं बरा होशील असें म्हणावें काय. हें कोडें मला उकलेना व मी आश्चर्यांत चूर झालों. परंतु तूं तिसऱ्या दिवशीं बरा होशील घाबरूं नको या शब्दानीं जादू भरल्यासारखा होऊन मला आनंद झाला व मी नारायणदादा म्हणून हांक मारली. नारायणदादा तर माझे जवळच बसले होते. त्यांनीं हांक ऐकल्यावर गणपतरावजी, काय पाहिजे म्हणोन विचारलें. तेव्हां मी त्यांना घडलेला वृत्तांत यथासांग सांगितला. तो ऐकतांच त्यांचे चेहऱ्यावर आनंद झळकूं लागला व त्यांचे नेत्रांत प्रेमाश्रू आलेले मला दिसले. ते त्यांनीं पुसल्यावर ते मला म्हणाले कीं, गणपतरावजी काळजी करूं नका. तुम्हीं दृष्टांताप्रमाणें नेमल्या दिवशीं बरे व्हाल. मलाही त्यांचे या आशीर्वचनानें मोठा धीर आला. व मला तीन चार महिन्यांपासून अन्न व पाणी पिण्याची ताकत नव्हती व त्यांतच सायटीकेच्या झणकाऱ्याच्या वेदना होत होत्या त्यामुळें ग्लानी आली होती तरी थोडी हुशारी वाटूं लागली. होतां होतां तिसरा दिवस उगवला व मला प्रातःकाळींच चहा घ्यावा अशी इच्छा झाली. ती मी नारायणदादांस सांगतांच त्यांनीं ताबडतोब चहा करवून पेला भरून मजपुढें ठेविला. मी तो पिण्याकरतां हातीं धरला खरा, परंतु हा चहा माझे घशाखालीं कसा उतरेल अशी मला शंका येऊन मी तो कप खालीं ठेवला. हें पाहातांच नारायणदादा म्हणाले, गणपतरावजी हें काय? तेव्हां मी

त्यांना सांगितलें कीं, चहा पिण्यावर माझी इच्छा गेली आहे, परंतु मला पाणी घोटतां येत नाहीं अशा स्थितींत हा गरम चहा कसा घेतला जाईल. कप तोंडास लावून व्यर्थ नुकसान करणें आहे. तेव्हां नारायण दादानें कळकळीनें सांगितलें कीं, गणपतरावजी कप् बिघडल्यानें नुकसान होईल तर होऊं द्या; परंतु तुम्ही कप् तोंडास तर लावा. त्यांनीं आग्रह केल्यानें मी कप् तोंडास लावून चहा सिप् करूं लागलों तों मला कांहीं तकलीफ न होतां उलट जों जों घोट जाई तों तों मला हुशारीच वाटूं लागली व तो पुरा पेला मी खलास केला. त्यावर तासभरानें भूक लागली. व कांहीं खावें असें वाटूं लागलें. तेव्हां तीही इच्छा नारायणदादांस कळवितांच त्यांनीं ताबडतोब भात करवून शेवही करविला व जवळ बसून मला भोजन घातलें. तीनचार महिन्यांत मी अन्नास शिवलों नव्हतों, परंतु ह्या दिवशीं मी नेहमीप्रमाणें भोजन केलें. नंतर सायंकाळीं नारायणदादा मला श्री रामजीच्या दर्शनास माझा हात धरून पायीं घेऊन गेले. दर्शन घेतल्यावर त्यांचे शेतवाडीवर चलण्याचा त्यांनीं आग्रह केला व नाहीं हो करतां करतां ते मला तेथवर पायींच घेऊन गेले व तेथून रात्रौ आठाचे सुमारास तीनचार मैलाचा व्यायाम करवून ते मला घरीं घेऊन आले. घरीं आल्यावरोबर त्यांनीं मला विचारलें कीं तुमचें दुखणें कसें आहे? मी लागलीच उत्तर दिलें कीं माझें कांहीं दुखत नाहीं. फिरल्यामुळें थोडा थकवा आला आहे. हें ऐकतांच नारायणदादांच्या नेत्रांतून अश्रू गळूं लागले. ते पाहातांच हें काय म्हणून मी त्यांना साहजीकच प्रश्न केला. त्याच्या उत्तरांत ते म्हणाले कीं, गणपतरावजी, तुम्हांस गाडींतून येतांना पाहिल्याबरोबरच माझे मनांत धस्स झालें. व तुमची संगति दोन तीन दिवसांहून जास्त दिवस लाभत नाहींसें वाटून मी माझे गुरुमाउलीस शरण जाऊन तुमचें संकट टाळण्याची विनवणी केली होती व त्या गुरुमाउलीनें स्वहस्तानें दिलेला प्रसाद ( उदी ) तुमचे मस्तकास मी त्याच उद्देशानें लाविली होती. माझे बाबा दीनाचे कैवारी भक्तकाजकल्पद्रुम आहेत. त्यांनींच तुम्हांस ते दिवशीं संन्याशाचे रूपानें दर्शन देऊन तिसरे दिवशीं बरा होशील धीर धर असा आशीर्वाद दिला होता व आज त्या गोष्टीस तिसराच दिवस आहे. आज

तुम्ही चहा घेतला. थोडेबहुत खाल्लेंही, कांहीं दुखत नाहीं म्हणूनही म्हणत आहां. तेव्हां हा सर्व चमत्कार श्री साईबाबांचाच आहे. मी त्यांच्या अनेक भक्तांपैकीं एक भक्त आहे व माझी इच्छा इतकीच आहे कीं तुम्ही स्वतः शिर्डीस जाऊन बाबांच्या पायांवर मस्तक ठेऊन त्यांचे भजनांत मग्न व्हावें. तुमचें कल्याण होईल. त्यावर मी शिर्डीस जरूर जाईन व बाबांचें दर्शन घेईन असें त्यांना वचन दिलें. व तेव्हांपासूनच मी श्री साईबाबांचे चरणीं लीन झालों आहे. पुढें कांहीं दिवसानंतर मी शिर्डीस गेल्या वेळीं श्री साईबाबांनी मला पाहतांच म्हटलें कीं; "भाऊ येऊं येऊं म्हणत होतास. लवकरच आलास." हे शब्द कानीं पडतांच मी दीड वर्षांपूर्वी जिजगांवास नारायणदादांस जें वचन दिलें होतें तें ताबडतोब पुरें झालें नसल्याबद्दल बाबांनीं इशारा केल्याचें पटून मी लागलीच बाबांचे पाय धरून उशीर झाल्याबद्दल क्षमा मागितली. तेव्हां समर्थांनीं माझे डोक्यावरून हात फिरवून म्हटलें कीं, " भाऊ चांगले कार्यास कधींही विलंब करूं नये. बरें बैस."

ह्या अल्पशा विवेचनावरून श्री समर्थांनीं मजसारख्या दीनास कसें तारलें व संकटसमयीं कशी धांव घेतली त्याचा भक्तमंडळीचे मनांत साहजिकच ठसा उमटेल अशी आशा आहे. शेवटीं वेडेंवाकुडें गाईन । दास तूझा म्हणवीन ॥ अशी बाबांचे चरणीं विनवणीं करून मी आपली रजा घेतों.

सुनेल.<br>ता. २०-१-२७

आपला<br>**गणेश केशव रेगे**

रा. रा. म्यानेजर साहेब साईलीला,

सा. न. वि. वि. श्रीसमर्थांनीं मला दिलेला दुसरा दृष्टांत पाठवीत आहें आहे. कोणत्याही अंकांत त्यास जागा मिळेल अशी उमेद आहे.

माझी चौथी कन्या उपवर झाली तेव्हां तिला योग्य वर पाहण्याकरतां मी शिकस्त केली. कोठें मनाजोगें स्थळ मिळेना. माझी स्थिति गरीबीची. परंतु मनांत असें येई कीं मुलगी चांगल्या खातेपितेघरीं पडावी. परंतु हें घडावें कसें ? आजकालचा मनु म्हणजे गरीब स्थितींतील मनुष्य महादोषी असें मानण्याचा होऊन बसला आहे. तशांत मुलीचा बाप तर महा पातकीच

समजला जातो. त्यानें मुलाचे बापाकडे बोलणें करण्याचा विचार केला तर मुलाचे बापास बोलणेंच जिवावर येतें. कदाचित मेहेरनजर होऊन मुलीच्या बापाशीं बोलण्याचा त्यानें उदारपणा दाखविलाच तर तो हुंड्याची मणभराची शिला मुलीच्या बापाचे मस्तकावर आदळतो त्यामुळें मुलीचा बाप प्राण घेऊनच पाय काढतो. अस्तु. अशा अनेक अडचणी असल्या तरी 'कन्येपूर्वी तिच्या पतीतें विधि निपजवितो भार्ये । ईशाज्ञेविण कांहीं न घडती सृष्टींतील तीं कार्यें ।' असें कै. कवी अण्णासाहेब किर्लोस्करानीं म्हटलें आहे तेंच खरें होतें. सृष्टिनियमानुसार मुलें व मुलींही होणारच. कोण्या एका व्यक्तीस मुलांचीच 'मनापली' व दुसऱ्यास केवळ मुलीच मुली व्हाव्यात असा ईश्वरी संकेत दिसून येत नाहीं. परंतु मी 'मुलाचा बाप' ह्या कोरड्या अभिमानानें आमच्या समाजांतील गरीब मुलींच्या बापांना काय त्रास सोसावा लागत आहे ह्याची कल्पना जे मुलींचे बाप असतील तेच करूं शकतील. अस्तु. स्थळासंबंधानें मी इंदूर, उज्जैन, वगैरे आसपासचे गांवीं खटपट केली परंतु कांहीं जमेना. अखेर ठाणें, मुंबई वगैरे ठिकाणीं धांव ठोकून स्थळें पाहिलीं. त्यांत बडोद्यास स्थळ पाहण्यास मी गेलों होतों त्यावेळीं तेथें दोन मुलगे माझ्या पाहण्यांत आले होते. त्यापैकीं एक चांगला सुदृढ व मुलीस साजेसा मला दिसला व मी माझे नातेवाईकाचे मार्फत बोलणेंही सुरू केलें व मला जरूरीचें काम असल्यानें मीं तावडतोब इंदूरास गेलों. आतां ह्या गडबडींत असें झालें कीं माझे नातेवाईक ज्या मुलाचे नांव गांव मला लिहीत तो मी पाहिलेला आणि ठरविलेलाच मुलगा असावा अशी माझी समजूत झाली व तिथी ठरविण्यापावेतों पाळीही येऊन ठेपली. परंतु माझी चूक तावडतोब दुरुस्त करणें बरें असें श्री समर्थांच्या ध्यानीं आल्यानें त्यांनीं माझे मुलाच मनांत प्रेरणा केली व तो स्वतः बडोद्यास गेला व त्या मुलास त्यानें पाहिलें. व लागलीच मला लिहिलें कीं मुलगा पाहण्यांत कांहींतरी चूक झाली आहे. हा मुलगा अगदीं नाताकत असून मुलीस मुळींच योग्य नाहीं. तें पत्र पाहातांच मला मोठें कोडें पडलें परंतु त्या मुलानेंच स्वदस्तूरचें मला पत्र पाठवून एकंदर हकीकत कळवून दुसरें स्थळ पाहण्याविषयीं मला खुलासा केल्यानें माझी मोठी चूक होत होती

हें समजून पुनः दुसरें स्थळ पहाण्याची फिकर पैदा झाली. ह्याच सुमारास मी माझ्या मेहुण्यास भेटण्याकरितां अंजनगावीं गेलों. तेथें एके दिवशीं दोन प्रहरचे सुमारास मी आडवा झालों असतां 'तूं जीरापुरास जा' असे शब्द माझ्या कानीं पडले. ते कानीं पडतांच हा आदेश अन्य कोणाचा नसून श्री समर्थांचाच आहे असें माझ्या मनानें घेतलें व मीं तावडतोब इंदूरास जाण्या-करतां निघालों. आतां 'जीरापूर' हा जरी होळकरशाहींतलाच एक महाल आहे तरी तो म्यां पूर्वी कधींही पाहिला नव्हता. अथवा तेथें जावयाचें मला कांहीं प्रयोजनही नव्हतें. परंतु श्रीसमर्थांना तर मला तेथें पाठवून लग्नाचा योग जुळवून द्यावयाचा होता. त्या करतां त्यांनीं असा चमत्कार घडवून आणला कीं, मी महत्पूर महालीहून तेथील वरिष्ठअधिकाऱ्याच्या स्वैर वर्तनास कंटा-ळून फर्लो घेतली होती. ती फर्लो संपतांच मला पुनः महत्पुरासच रुजू व्हावें लागतें; परंतु मुदत संपतांच मला महत्पुरचे ऐवजीं जीरापुरास रुजू व्हावें असा रेव्हिन्यूमिनिस्टर साहेबांचा अचानक हुकूम झाला व त्यावरून मला जीरापुरास जावें लागलें. तेथें गेल्यावर तेथून आठ कोसांवर 'सोयत' म्हणून शिंदेशाहींतील एक गांव आहे तेथें रा. नाबर ह्यांचा वडील मुलगा आपल्या मुलीस योग्य आहे अशी मला खबर लागली. त्यावरून मी तेथें गेलों व मुलास पाहून माझी पत्नी व मुलगा ह्यांच्या सम्मतीनें जाब नक्की ठरविला व लागलीच एक महिन्याबाद मुहूर्त ठरून श्रीसमर्थांनीं कार्य निर्विघ्न पार पाडलें.

सारांश, 'जीरापुरास जा' म्हणून अंजनगांवीं जो दृष्टांत दिला त्यांतील हेतूं वर लिहिल्याप्रमाणें होता. श्रीसमर्थ कशा युक्तिप्रयुक्तीनें घाबरलेल्या भक्तास धीर देऊन संकटांतून पार करीत ह्याचें हें ढळढळीत उदाहरण आहे. माझे बाबा दीनानाथ आहेत. त्यांनीं त्यांच्या असंख्यभक्तांना संकटसमयीं धांव घेऊन असेंच तारलें आहे. ह्या त्यांच्या उपकाराबद्दल माझ्यासारख्या दीन पामराकडून त्यांचे गुणानुवाद वर्णन होणें अशक्य आहे. सबब "वेडें वाकुडें गाईन ॥ दास तूझा म्हणवीन ॥ येवढी श्रीसमर्थ चरणीं विनवणी समर्पण करून आपली रजा घेतों.

सुनेल ( होळकर स्टेट )

आपला

ता. ३०-१-२-२६

गणेश केशव रेगे अमीन ( तेहसीलदार )

## श्रीसाईनाथ प्रसन्न

सप्रेम न. वि. वि. खालीं लिहिलेला "अनुभव" श्रीसाईलीला मासिक पुस्तकांत जरूर तो फेरफार करून प्रसिद्ध होण्याकरितां पाठवित आहें. आपणास योग्य वाटल्यास सवडी प्रमाणें प्रसिद्ध करावा.

"दास म्हणे भाव पाहिजे अंतरीं । प्रगटे श्रीहरि आपोआप ॥"

मी लेनाड बुद्रुक ता. शहापूर जि. ठाणें येथील श्रीहनुमान मंदिरांत "रामचरित मानस" या तुलसीदासकृत ग्रंथाचें वाचन सुरू केलें होतें. श्रवणास बरींच भाविक मंडळी येत असे. इतक्यांत सद्गुरु साईनाथांचे प्रिय भक्त "उद्धवेशबुवा--शामदास" हे हरिभक्तिपरायण श्रीयुत हरि केशव शेट गुजरे यांचे माडीवरील दिवाणखान्यांत येऊन उतरले व तेथें बाबांची तसबीर मांडून नित्य पूजा, आरती, पुराण वगैरे सुरू केलें.

जेथें शाम तिथेंचि नित्य वसे हा सदा सुखें साई ।
म्हणुनी तद्दर्शनोत्पर-जन प्रेमें त्या स्थलीं मुदें जाई ॥

या आर्येतील भावार्था प्रमाणें आम्हां सर्वांस पूर्ण अनुभव आला, आणि तो सर्व दिवाणखाना साईच्या व्यापकतेनें सर्व भरलेला असून तें उपासना मंदिरच आहे कीं काय असा भास झाला. असो.

याप्रमाणें चार दिवस शामदासांचें पुराण एकनाथी भागवतावर चालू होतें व श्रोतृगण तल्लीन होत होता. इतक्यांत चौथे दिवशीं रात्रीं सुमारें तीन चार वाजण्याचे सुमारास मी हनुमान मंदिरांत निजलों असतांना बाबा आले, आणि मारुतीरायाचे अंगणांत उभे राहून, "तुझ्या कल्पनेंतील मला कांहीं दे" असें दोन वेळां सांगून गेले. उजाडल्यावर सकाळीं मी उद्धवेश बुवांची भेट घेऊन त्यांस सर्व प्रकार निवेदन केला. आणि माझ्या-कडून पुराण रूपानें सेवा घेण्याची बाबांची इच्छा दिसते तरी आपली आज्ञा झाल्यास आपलें पुराण झाल्यावर थोडा वेळ मी महाराजांची सेवा करणार आहे असें सांगितलें. बाबांच्या कृपेनें सांगण्याचा विषय, व ग्रंथ यांविषयीं मला फार परिश्रम करावे लागले नाहींत. श्रीसाईलीला. मासि-कांतील—" श्रीगुरुराया तवचरणाया भाळ ठेवितों नमना या ॥ " " साई

तुझ्याच पायां । नित ठेवि डोई सखया ॥" या दोन पदांच्या आधारें सुमारें पाऊणतास प्रवचन केलें. गुरुभक्त-भीष्म आणि शामदास यांचीं हीं दोन पद्यें व त्यांतील भावार्थ श्रोत्यांस तर आवडलाच, पण त्यासंबंधानें एकंदर सर्व प्रवचन बाबांसही फार आवडलें आणि त्याच रात्रीं पुन्हां दृष्टांत देऊन सांगितलें कीं मी तुला एका शब्दांत सुचविलें असून तूं फार चांगलें काम केलेंस. तरी सदहू दोन्हीं पद्यांतील भावार्थाचें सूक्ष्मपणें वाचकांनीं मनन करावें अशी नम्रपणें चरणी विनंति करितों.

या नंतर तारीख ९-९-२६ रोजीं सुमारें सकाळचे आठ वाजल्यापासून सायंकाळीं पांच वाजेपावेतों बाबांचें अदृश्यरूपानें वास्तव्य हनुमान-मंदिरांत माझे विराडीं होतें. तसबिरींतील मूर्तीस विशेष प्रकारें शोभा आली होती. सकाळीं एका कुमारीनें बाबांकरितां सुंदर हार आणून दिला. दुसऱ्या एका गृहस्थानें सांजा आणि गंगाप्रसाद आणून दिला. तिसऱ्या एकानें मिठाई पाठवून दिली आणि हें सर्व न मागतां आपोआप आलें. माझी गृहस्थिति अडचणीची असल्यामुळें बाबांस दया येऊन त्यांनीं आपणास लागणाऱ्या सर्व साहित्याचा योग परभारें जुळवून आणिला याचें मला कौतुक वाटलें. असो. त्या दिवशीं पुराणाचे वेळींही सर्वत्र मंडळीस कारणाशिवाय जिकडे विशेष शोभा, आनंद, हीं अनुभवास येत होतीं. मारुतीरायाचें तेजही अलौकिक होतें. त्या दिवसाचा पुराणाचा भागही वशिष्ठ रामचंद्राचे भेटीकरितां रामचंद्राचे महालांत आल्याचा होता व गुरुशिष्यांची सप्रेम भेट होऊन सुखसंवाद झाला. असा कथाभाग ओघानेंच आला होता. आज पुराण समाप्तीनंतर प्रत्यक्षरूपानें राहाणार नाहीं व कधीं कधीं भेट देईन असें बाबांचें मनोगत असल्याचें मागाहून कळलें. असो. याप्रमाणें बाबा "सदैव सर्वत्र वास करून आहेत असा दृढ विश्वास ठेवून सर्वत्रांनीं वागावें याकरितांच हें प्रसिद्ध करण्यांत येत आहे. कळावें.

आपला.

बाबांचा एक नम्रदास

गोविंद सिताराम प्रभुमास्तर (मु० पो० शहापूर-ठाणें)

## ( एका साईभक्ताकडून )

मी सन १९१७ सालीं श्रीसमर्थ साईनाथांच्या दर्शनास गेलों. जाण्याच्या आधीं श्रीसमर्थांच्या लीला दुसऱ्याच्या तोंडून ऐकिल्यामुळें प्रत्यक्ष ईश्वररूप असलेल्या साईबाबांना भेटावें अशी मनाची उत्कट इच्छा झाली होती. परिस्थिती फारच प्रतिकूल होती. शिरडी कोणत्या बाजूला आहे, कोणत्या ठिकाणाहून तिकडे जावें लागतें ह्याची कांहीं एक माहिती मला नव्हती. शिरडीस जाण्यास निघण्यापूर्वी सुमारें १५ दिवस आधीं माझा मुलगा ( सुमारें वयानें ६।७ महिन्यांचा ) तापानें वारला. ह्या प्रसंगामुळें मन जास्त अस्वस्थ झालें होतें व त्यामुळें श्रीसमर्थांस केव्हां पाहीन असें मला झालें होतें. पुढें १।२ दिवसांनीं स्वप्नांमध्यें मला ४।५ सत्पुरुष एके ठिकाणीं म्हणजे बाबा बसत असत त्या मशिदीसारख्या जागेप्रमाणें असलेल्या एका जागेंत बसलेले दिसले. त्यांचे समोर बरींच राख अगर उदी पडलेली मला दिसली. बाबा कोठें आहेत असें त्यापैकीं एकास मी विचारलें. त्यानें मला बाबांकडे बोट करून दाखविलें. नंतर मी त्यांच्या पायां पडलों. इतक्यांत मी जागा झालों. पुढें ४।५ दिवसांनीं माझी पैशाची ( जाण्याच्या खर्चाची ) अडचण दूर झाली. व मला खुद्द घरचा एक वाटाड्या शिरडीपर्यंत बाबांचें दर्शन घेण्यास येण्याकरितां, माझे बरोबर येण्यास निघाला. १ रुपया दक्षणा द्यावयाची असें मी जातांना ठरविलें. त्याप्रमाणें दर्शनास जातांच बाबांनीं मज-जवळ १ रुपया मागितला. दर्शनास गेलों तेव्हां माझ्याकडे पाहून म्हणाले– " दुःख करण्याचें कारण काय ? म्हणे मुलगा गेला, मलाही एके दिवशीं देह ठेवावयाचा आहे. मृत्युलोकांत आल्यावर मृत्यु हा आज नाहीं उद्यां येणारच. " मी ४ दिवस राहिल्यावर जाण्याची परवानगी मागितली व कोपरगांव स्टेशनवर आलों. तेथें आल्यावर गाडी येण्यास १ तास अवकाश आहे असें स्टेशन मास्तरनीं आम्हांस सांगितलें. गाडी १ तास उशिरां ( कारण मागील स्टेशनवर ॲक्सीडेंन्ट झाला होता ) आल्यामुळें मनमाडवरून मुंबईस जाणारी मेल आम्हाला मिळणार नाहीं असें गाडींतील मंडळीनें आम्हांस

सांगितलें. परंतु श्री बाबांच्या कृपेनें मला अडचण येणार नाहीं असें मला वाटत होतें. व त्याप्रमाणें गाडी मनमाडला आल्यावर मेलचा त्रास करितां मेल १ तास उशिरां यावयाची आहे असें मास्तरनीं सांगितलें. कारण मेललाही वाटेंत ॲक्सीडेंन्ट झाला होता. अशा रीतीनें आम्हाला अडचण आली नाहीं. बाबांच्या (साईनाथ) कृपेनें मी हल्लीं पूर्वींपेक्षां चांगल्या स्थितींत आहे. व जेव्हां जेव्हां माझें आराध्यदैवत शंकर याची मी मानसपूजा करावयास जातों त्या त्या वेळीं शंकराच्या पिंडीवर माझे बाबा बसलेले आहेत असें मला दिसतें.

## Shri Gajanan.

*Bombay* 10-3-27'

Thursday

In the last week of January 1927 I was suffering from 3 boils on my legs. Prior to this I had an earnest desire to read some life of Sai Nath.' My neighbour who saw a portrait of Sai Nath worshiped at my lodging was of his own accord inclined to bring Sai Lila Magazines to me for reading. I read these and resolved to use the residue of 'Agarbatti for my boils instead of using any gum as I thonght and I read that many devotees of 'Baba' got recovered from suffering by applying Udi, I resolved to follow these devotees. I used to apply the remains of 'Agarbatti' to my boils- I got cured within a week without any usual tronbles to a large extent. I have got a post card portrait of Sai Nath which I invariably bear in my pocket and see it before I begin any work and I find up to this day that all my usual difficulties are removed and everything is done to my satisfaction. This goes to prove the Omnipotence of my 'Sai Nath' whom I would like to call 'Baba'—the father of the world.

In February 1927 our office was amalgamated with that of the Collector of Bombay with a view to effect a drastic retrenchment. I was in anxiety as there was no security of my services being retained and this was a very hard time to get employment. 'Sai Baba' one night gave me 'Darshan' (Visit) laughed at me and said "Do not care for anything as long as I am with you."

# गुरुप्रसादोद्गार.

## –प्रातरारत्ति–

जयदेव जयदेव जय साईनाथा । जय सद्गुरुनाथा ।
आरती ओवाळूं निगमागम त्राता ॥ जयदेव० ॥

शिरडी ग्रामाचें हो भाग्य बहु थोर ।
कुग्रामाचें केलें त्वां सुंदर क्षेत्र ॥
पातक जरि असलें त्वद्दासाचें घोर ।
तव सामर्थ्यापुढतीं नच त्याचा जोर ॥ जयदेव० ॥ १ ॥

गंगा नाशी पापा शशि तो तापातें ।
कल्पतरू तो दैन्या परि नच सम तूतें ॥
पापातापा दैन्या दोषां सर्वांतें ।
सद्गुरु वाचुनि कोणी नच जाळूं शकतें ॥ जयदेव० ॥ २ ॥

वात्सल्यें दीनातें ओढुनिया घेसी ।
अनुभव दावुनि पुढतीं तारक तूं होसी ॥
निष्ठाप्रज्ञा जाणुनि कार्यी योजीसी ।
निजस्वरूपापासुनियां नचतूं वा ढळसी । जयदेव० ॥ ३ ॥

मुनींद्र सनकानेंहि मम साईनाथा ।
तव वैराग्या पाहुनि डोलविजे माथा ॥
ज्ञाननिधी तूं आमचा तुज ऐसा दाता ।
सांप्रत न दिसे मजला श्रीसाईनाथा ॥ जयदेव० ॥ ४ ॥

जीवब्रह्मैक्याचा अनुभव प्रत्यक्ष ।
द्यावया समर्थ तूं वा तैसाचि दक्ष ॥
परि हा जनचि अभागी नच देई लक्ष ।
अति दुर्धर हा उल्टा अश्वत्थ वृक्ष ॥ जयदेव० ॥ ५ ॥

अनन्य भगवद्भक्तिच नौका जीवासी ।
माया तरण्या गीता वाणि वदे ऐसी ॥
भगवान् आम्हां निश्चित गुरुराया गमसी ।
तव पादांबुज विरहित आश्रय नच मजसी ॥ जयदेव० ॥ ६ ॥

ह्यास्तव सहजचि कारण अनन्य तव भक्ति ।
कार्य तियेचें मायानाशाची प्राप्ति ॥
मजला देईं भिक्षा तवपादासक्ती ।
दीन दासा देई वा न सुखें मुक्ति ॥ जयदेव० ॥ ७ ॥

चळों न यावी माझी मति साईराया ॥
प्रसाद इतुका मागुनि लागतसें पायां ॥
तुजविण इतरा न विकीं कदापि मी काया ॥
दासा रामम्यातें नच दवडी वांया ॥ जयदेव० ॥ ८ ॥

## आत्मनिवेदन.

(अभंग)

ब्रह्मकर्मशिक्षा मातामहें केली ॥ बाल्यीं तीच आली फळा अंतीं ॥ १ ॥
कर्ममार्गी गर्क होतों कांहीं वर्षें । पुढें संगदोषें ये नास्तिक्य ॥ २ ॥
झाली कांहीं काळें विवेका जाग्रति । मागुती ती मति पालटली ॥३॥
ग्रंथावलोकनें विश्वास अद्वैतीं ॥ बैसूनी सत्पथीं लागलों मी ॥ ४॥
मना स्थैर्य येण्या स्थान एक व्हावें ॥ तें वाटें असावें शांतरूप ॥ ५ ॥
नंतर शोधाया लागलों स्वस्थान ॥ ठेवूनी प्रस्थान संतपायीं ॥ ६ ॥
संतदर्शनेंही मज कांहीं झालीं ॥ त्यापुण्यें लाभली सद्वासना ॥ ७ ॥
शेवीं अकस्मात साईपदीं गेलों ॥ तेथेंचि बैसलों धरणेसी ॥ ८ ॥
जिज्ञासा चिकित्सा होत्याच सांगाती ॥ शिरडींत वस्ती फार झाली ॥ ९ ॥
दया क्षमा शांति अखंड वैराग्य ॥ देखण्याचें भाग्य प्राप्त झालें ॥ १० ॥

परिच्छेदत्रयें अबाधित ज्ञान ॥ पाहूनि मन्मन शांत झालें ॥ ११ ॥
तेव्हां पुढें झाली मना आतुरता । साईपदीं माथा केव्हां ठेवूं ॥ १२॥
तोंवरीं नमन होतें तें कायिक । पुढें मानसिक खरें झालें ॥ १३ ॥
अहंता दुर्बुद्धि त्यागुनियां गेलों । तेणें पात्र झालों आशिर्वादा ॥ १४ ॥
थोर भाग्यें प्राप्त झाली गुरुमाय । आतां उणें काय मला साई ॥ १५ ॥
माझे भवपाश तूंचि सोडणार । ऐसा मला धीर दिला तुवां ॥ १६ ॥
तेवीं माझी निष्ठा दृढ तुझ्यापायीं । आहे ऐसें साई जाणसी तूं ॥ १७ ॥
**काया वाचा मन अर्पियलें तुला** ॥ आत्मलाभ मला व्हावा अंतीं ॥१८॥
पुन्हां माझें मन चळों नेदी कदा । रामय्यातें सदा पदीं राखी ॥ १९ ॥

## –प्रथम गुरुदर्शन–

(साकी)

साईची ती अगम्यलीला योगारूढां ठावी ।
तदितर जीवां अधिकाराविण कैशी ती उमजावी ॥ १ ॥
तात्यांच्या[1] सेवेसाठीं मजला शिरडीमाजीं ।
मित्रांकरवीं खेंचुनी नेलें नसतां मी हो राजी ॥ २ ॥
त्या सेवेची त्रिवार आज्ञा प्रथम दिनीं मज झाली ।
त्यांतिल भविष्यता ती कोणा समजुनि नाहीं आली ॥ ३ ॥
मज परत जावया आज्ञा द्या ऐसें कांहीं दिवशीं ।
प्रार्थित शामा[2] असतां साई वदले वाचा ऐशी ॥ ४ ॥
"श्वानापरि ह्या मशिदीपुढें त्या पडूनि राहूं देई ।
कार्य तयाचें पुढें असे तें तुजला ठावें नाहीं" ॥ ५ ॥

(१) कै. वा. श्रीयुत लक्ष्मण कृष्णाजी उर्फ तात्यासाहेब नूलकर, बी. ए.; एल्. एल्. बी. (२) रा. रा. माधवराव देशपांडे, शिरडीकर.

माधवरावें कळविलि मज ती सद्गुर्वाज्ञा जेव्हां ।
जाण्याचा मी बेत मनांतिल सोडुनि दिधला तेव्हां ॥ ६ ॥

कांहीं दिवसांनंतर तात्याबाला दुखणें आलें ।
सेवाकार्यप्रसंग तेव्हां उमजुनि संशय गेले ॥७॥

त्या कुग्रामीं तात्याबाचे पुरते हालचि होते ।
जरि कां मजला श्रीसाईनीं तेथें नेलें नसतें ॥ ८ ॥

ऐसें तात्याबाचि मला ते बदले समयीं एका ।
तेव्हां अगम्य साईलीला समजुनि आली लोकां ॥ ९ ॥

साई ! तव आज्ञेतें वंदुनि प्रिय मित्राची सेवा ।
दिनरजनीं म्यां सततचि केली टावें तुजला देवा ॥ १० ॥

तेवी दासगणूची भार्या तिच्याहि सेवे मजला ।
योजिलें त्वां तीही झाली उत्तम ठावें तुजला ॥ ११ ॥

उपनामावरि ठेवुनि मानस स्नुषा तिला मम म्हणसी ।
काय तुझें तें कौतुक सर्वां वेडावुनि तूं अससी ॥१२ ॥

संशय फेडुनि अमितचि माझे निजपदिं निष्ठा केली ।
माझी अढळचि आतां कां हो माया पातळ झाली ॥ १३॥

मम त्राता हो तुजविण कोणी नाहीं ऐसें कथिलें ।
त्वांचि मला रे तेव्हां तेंही त्रिसत्य कीं मज गमलें ॥ १४ ॥

तेव्हां पासुनि भाव तुझ्या मी अखंड पायीं धरिला ।
गुरुरूपें मी आजवरी हो त्वदन्य नाहीं वरिला ॥ १५ ॥

ह्यां उपरी मी तुजविण कोणा गुरुरूपें नच पाहीं ।
पाहिन तरि ही जळोचि दृष्टी जारिणिसम जी होई ॥ १६ ॥

तारी मारी किंवा जाळी ह्या देहा मम साई ।
परि मी तुजला न सोडि आतां ऐसें ठमजुनि राही ॥ १७ ॥

तव नाम मुखीं ध्यान तुझें हो सततचि मन्मनीं राहो ।
प्राणायामीं प्राण रतूनी पूर्णेंद्रियजय होवो ॥ १८ ॥
आत्मविवेका बुद्धीमाजीं परमात्मसुखाजीवीं ।
ठाव असो ह्या पंचदशांविण इच्छा मज नच ठेवी ॥ १९ ॥
प्रतिवेळीं हीच दक्षिणा तूं मागितली मज गमतें ।
पंध्रा रुपयांचे मिष करुनी उगवुनि घेई तीतें ॥ २० ॥
एका समयीं तुज दक्षिणाचि द्यायाला मजपाशीं ।
नव्हती तेव्हां त्वां सांगितलें उसनी आणायासी ॥ २१ ॥
नंतर मजला *काका वदले " रुपये नाहींत द्याया ।
परंतु पोथी बघतां मिळतिल व्हा हो राजी ध्याया " ॥ २२ ॥
वचनें त्यांच्या शंकित होउनि तसाचि हो तुजपाशीं ।
आलों तेव्हां उढवाउढवी त्वां केली मजपाशीं ॥ २३ ॥
" मज दक्षिणाचि नलगे आतां पुढतीं पाहुनि घेऊं " ।
ऐसें म्हणतां त्वां मम मानसिं विचार लागति येऊं ॥ २४ ॥
थोडया दिवशीं अवलोकी जैं नाथांच्या दों ओव्या ।
प्रश्न उकलला जरि त्या होत्या पूर्वी मजला ठाव्या ॥ २५ ॥
येके समयीं " या रामय्या " ऐसें म्हटलें मजला ।
" घ्या रामरामि ! " वदूनियां मग मंत्र दिला मजला ॥ २६ ॥
ह्या तव उक्तींचा मथितार्थहि समजुनि आला मजला ।
श्रद्धा होती जेथें माझी दृढता दिधली तिजला ॥ २७ ॥
अतर्क्य लीला ऐशी करुनी भक्तांतें मार्गासी ।
लाविसि परि श्रद्धेविण करणी तव नुमजे कोणासी ॥ २८ ॥
देणें घेणें सर्व तुजकडे मी देणारा नाहीं ।
घेसी नां तूं तव दक्षिणाची तरि मी दोषी नाहीं ॥ २९ ॥

---

* कै. रा.-श्रीयुत हरि सिताराम ऊर्फ भाऊसाहेब दीक्षित, सॉलिसिटर, मुंबई.

करिसी वा तूं करविसि जें जें त्यांतचि सुख तें माझें ।
अंतिम आहे हेंचि उमजणें खचितचि मजला साजे ॥ ३० ॥

इतुकें कळुनि अंतरिची हो तळमळ राहत नाहीं ।
ती घालविली नाहीं त्वां तरि वत्सलता तव कायी ॥ ३१ ॥

हा रामय्या तिष्ठत तुझिया द्वारीं नित्य भिकारी ।
त्याला सत्वर शांतीची तूं भिक्षा घालुनि वारी ॥ ३२ ॥

## –प्रार्थना–

इतुकें मज द्याहो, मज द्याहो । मम विनती परिसाहो ॥ इतुकें० ॥१॥
सत्संगें सत्पंथा लागुनि । प्रज्ञा माझी अमलचि होवो ॥ इतुकें० ॥ २ ॥
माया अवघी नासुनि साई । प्रेम सत्पदीं अखंड राहो ॥ इतुकें० ॥ ३ ॥
तुमच्या अंकीं निशिदिनि राहुनि । मनोनाश हा सत्वर होवो । इतुकें० ॥ ४ ॥
आनंदीं मज संतत ठेवुनी । अंतीं निजधामातें न्याहो । इतकें० ॥ ५ ॥
साइ सागरीं रामय्या हा । विलीन होउनि शांतचि राहो । इतुकें० ॥ ६ ॥

## –याचना–

( अभंग )

ज्ञानवैराग्याच्या प्राप्तीचीच भिक्षा । घाली विमलाक्षा साईराया ॥ १ ॥
आत्मलाभ आणि दुःखाची निवृत्ति । दोहींची प्रतीति आहे तींत ॥ २ ॥
तिच्यायोगें होते नित्य पूर्ण तृप्ति । पूर्णानंदप्राप्ति तीच होय ॥ ३ ॥
अन्य लाभ सारे वाटती कनिष्ट । न होय मी भ्रष्ट ऐसें करी ॥ ४ ॥
नित्यानित्य वस्तु विवेकाची खूण । बोलती सुजाण ऐशी असे ॥ ५ ॥
बोलावूनि मला दिला समागम । पूर्ण करी काम उरलें तें ॥ ६ ॥
दर्शनाच्या पूर्वी बरा होतों आतां । कांहो साईनाथा पिसें केलें ॥ ७ ॥
ज्ञानांजनावीण बरा होत नाहीं । माझा तूंचि साई वैद्यराज ॥ ८ ॥

न देतां तें सारा खटाटोप वांया । जाईल हें राया काय नेणा ॥ ९ ॥
न जाणें मी पूजा ना तें आवाहन । किंवा तवार्चन गुरुमाये ॥ १० ॥
तथापि भिक्षेचा माझा अधिकार । दातृत्व अपार तुजपाशीं ॥११॥
माझा अंगीकार निजमुखें तुवा । केला आतां देवा पात्र वेगीं॥१२॥
भक्तवत्सळ ह्या स्वकीय ब्रीदार्थ । करी बा कृतार्थ रामय्यातें ॥ १३ ॥

## तळमळ

( अभंग )

बारे साईनाथा कधीं भेट देसी । होतो कासाविसी जीव माझा ॥ १ ॥
रूप जें विनाशी तेंहि चोरियेलें । कांहो मज केलें दीनवाणें ॥२॥
त्या देहाच्याद्वारें अविनाशीरूप । पहाया हुरूप मनीं होता ॥ ३ ॥
परि दुर्भाग्यें मी मुकलों त्या ठाया । आतां देवराया काय करूं ॥ ४ ॥
आपुलें वचन पाळूनियां नाथा । तारी ह्या अनाथा साक्षात्कारें ॥ ५ ॥
त्यावीण ह्या दीना कधीं नोहे शांति । काय विश्वपति नेणसी तूं ॥ ६ ॥
नको अंत माझा पाहूं दीननाथा । तुझ्या अंकीं माथा अर्पिलासे ॥ ७ ॥
तारी किंवा मारी बालक आपुलें । शरण ज्या केलें निजरूपीं ॥ ८ ॥
शाब्दिक ज्ञानाचा आला असे वीट । होसी ना प्रकट कां मच्चित्तीं ॥ ९ ॥
तुझ्या दासा ऐशी मनीं तळमळ । ह्याचें नांव छळ कैसें नाहीं ॥ १० ॥
जन्ममृत्यूचें तें भय नाहीं मज । माझें सर्व काज साक्षात्कारीं ॥ ११ ॥
तो लाभेपर्यंत असे अंश तुझा । त्याच्यापुढें माझा तूं सर्वस्वीं ॥ १२ ॥
ऐसें झाल्यावरी नासे मी-तूं-भाव । अंतीं मज ठाव तव रूपीं ॥ १३ ॥
सद्गुरु माउली रक्ष रक्ष मज । दास वंदीं तुज रामय्या हा ॥ १४ ॥

## –धावा–

( साकी )

साइ हो तूं येइ बा तूं येई । भेटी सत्वरिं देई ॥ साइ हो० ॥
मस्तक तव अंकावरि ठेवुनि भाव धरियला पायीं ।
पुढतीं मज एकाकी त्यजिलें कोण मजकडे पाही ॥ साइ हो० १ ॥

चुकवुनियां मज तूं गेलासी पत्ता लागत नाहीं ।
मज शरणांगत व्हाया तुजविण स्थानचि दुसरें नाहीं ॥ तातहो० ॥ २ ॥
मम हृदयीं तूं चोरुनि असतां लाभ तयाचा कायी ।
सर्वव्यापी असूनियां तूं दृश्य मला बा नाहीं ॥ समर्था० ॥ ३ ॥
हंबरडा हा फोडित बालक कां करुणा नच येई ।
साक्षात्कारें उघडुनि दृष्टी मजला निजपद देई ॥ दयाळा० ॥ ४ ॥
दुःखाश्रू मम दुःखद तुजला नसती कां बा कांहीं ।
साक्षात्कारावीण मला हा प्राण नकोसा होई ॥ कृपाळा० ॥ ५ ॥
भार तुजवरी टाकुनियां हा जीव धरुनियां राही ।
शरणांगत रामय्या हा बा त्याची घडगति नाहीं ॥ वत्सला० ॥ ६ ॥

## -नित्यपाठाचे श्लोक-

नमो साइनाथा नमो दीनबंधो । चिदैश्वर्य वैराग्य श्रीधर्मसिंधो ॥
यशोमूर्ति तूतें नमो ब्रह्मरूपा । नमो सद्गुरो शान्तमूर्ते अरूपा ॥ १ ॥
नमो निष्क्रिया निर्गुणा निर्विकारा । किती पाहसी माझिया दुर्विकारा ॥
मला तूं न होसी जरी सौख्यदाता । तरी पामरा कोण तारील आतां ॥ २ ॥
तुवां भेटण्या लाविला काळ फार । नको ह्यापुढें घोर संसार भार ॥
किती दीन होऊं किती ताप साहूं । कधीं सौख्य देसी किती वाट पाहूं ॥ ३ ॥
लखोबानिमित्तें तुझा दास दीन । कृपापात्र हा जाहला तेवि लीन ॥
तुझ्या पादयुग्मीं तरी स्वीकृतातें । त्वरेनें सख्या धाडिहो सत्पदातें ॥ ४ ॥
तुझ्या पाउलांतें न सोडीं कदां मी । नसे हेतु मातें कदापीहि दामीं ॥
प्रपंचीं मला व्यर्थ चिंता किमर्थ । तियेला निवारावया तूं समर्थ ॥ ५ ॥

(१) मित्र लक्ष्मण कृष्णाजी ऊर्फ तात्यासाहेब नूलकर ह्यांच्या शेवटच्या आजारांत त्यांची उत्तम शुश्रूषा व्हावी एतदर्थ मित्र हरि सीताराम, ऊर्फ भाऊसाहेब दीक्षित इत्यादि गृहस्थांना प्रेरणा करून त्यांच्याकडून मला जुलमानें अगाऊच शिरडीस नेऊन ठेविलें होतें.

" समर्थाचिया सेवका वक्र पाहे । असा सर्व भूमंडळीं कोण आहे " ॥
समर्थोक्ति ही काय मिथ्या म्हणावी । तुझी योग्यता अल्प कोणी गणावी ॥६॥
मला मुक्तिचें भाग्य देतां तुलारे । किती कायसे कष्ट होणार वारे ॥
तुलां योग्य वाटे तसें दास्य घेईं । स्वधामा मला शीघ्र धाडूनि देईं ॥ ७ ॥
तुझ्या पादयुग्माविणें अन्य थारा । असेना मला काय सांगूं उदारा ॥
जसा होतसे जीवनावीण मीन । निळोबा तसा त्वत्प्रसादार्थ दीन ॥ ८ ॥

## -आत्मविश्वास-

( अभंग )

आहों तैसे राहूं आम्हीं सर्व काळीं । तो साई सांभाळी आम्हांप्रती ॥ १ ॥
नाहीं दुसऱ्याचें आम्हां कांहीं काम । साईचि निष्कामकर आम्हां ॥ २ ॥
आतां ह्यापुढतीं साधूं आत्मतुष्टि । भुक्ति मुक्ती मुष्टीं आम्हां मग ॥ ३ ॥
आमुची मुमुक्षा पूर्ण करी साई । इतर तो देई काय आम्हां ॥ ४ ॥
**राजे आणि रंक आम्हां सर्व सम । लौकिकी तो काम नाहीं आम्हां ॥५॥**
लौकिकी संपदा ध्यायी सर्व जन । ती तृणा समान मानूं आम्हीं ॥ ६ ॥
प्रारब्धें हा देह राहे तैसा राहो । त्याकडे न पाहों आम्हीं आतां ॥ ७ ॥
देहद्वयासवें प्रारब्ध जीं कर्में । तीं होतीं अकर्में भोगांअंतीं ॥ ८ ॥
क्रियमाण अर्पूं साईनाथापायीं । विल्यातें नेई तो संचित ॥ ९ ॥
आमुचें तें काम एका साईपाशीं । आम्हीं इतरासी नव्हों लीन ॥ १० ॥
साईच्या आधारें मत्त झालों आम्हीं ॥ विषयांची उर्मी नाशील तो ॥ ११ ॥
परोपकाराचा काम तोहि शीण । साईइच्छेवीण न घडेचि ॥ १२ ॥
त्यामाजीं अहंता ती आम्हासि नाहीं । घडवितो साई तेंचि घडे ॥ १३ ॥
निज दासाला या लावो कांहीं कर्मीं । अथवा अकर्मीं योजो साई ॥ १४ ॥
आम्हास तों एका साईपदीं आस । तेथें सदा वास करूं आम्हीं ॥ १५ ॥
सर्वेश्वर साई हा मनी निर्धार । आम्हांसि आधार तोचि एक ॥ १६ ॥

एका साईवरी टाकूं आम्हीं भार । स्वसुख दातार तोचि आम्हां ॥ १७ ॥
गुरुकृपा झाली रामय्याच्यावरी । तो निज अंतरीं शांत राहे। । १८ ॥

## -अनुबंध चतुष्टय-

(आर्या)

ज्ञाता ब्रह्माचा तो ब्रह्मचि होई तसा असे साई ।
त्याच्या लाभें मजला आतां इच्छा नसे दुजीं कांहीं ॥ १ ॥
" सविलासमहामोहग्राहग्रासैककर्म " तूं ऐसा ।
मम गुरु असतां साई प्रगता त्यागीसि हो मला कैसा ॥ २ ॥
मागतसें मी तुजला त्या दानाची तुझी मला भाक ।
असतां सुधा घरीं ती टाकुनि मागेन मी कसा ताक ॥ ३ ॥
ब्रह्म खरें जग मिथ्या जीवचि कीं ब्रह्म या त्रयानाम ।
ज्ञान असे साचचि हें इतराठायीं नसो मना काम ॥ ४ ॥
ज्ञानचि प्रसवे मोक्षा ऐसें वेदान्तसिद्ध वाक्य असे ।
देहावसान झाल्या संभव ज्ञानासि तो मुळींच नसे ॥ ५ ॥
दंडकमंडलु ह्यांच्या नाशें नच मोक्ष त्यांसि तेवि नरा ।
देहाच्या पतनानें तो नच लाभे असाचि अर्थ खरा ॥ ६ ॥
प्राणोत्क्रमणात्पश्चान्नच लाभे ज्ञान जो तया देई ।
सद्गुरु त्याविण तारक सच्छिष्यातें दुजा कदा नाहीं ॥ ७ ॥
ज्ञान्याज्ञानी मिळतां उपदेशाची कुठें वसे सोय ।
जिज्ञासुहि तो तैसा अर्पाया ज्ञान पात्र नच होय ॥ ८ ॥
मिथुनाभावीं किमपिहिं नोहे फललाभ हें असें सिद्ध ।
बद्धातें ताराया लागे तो जो नसे स्वयें बद्ध ॥ ९ ॥
ब्रह्ममयचि तूं साई मोक्षेच्छु मीहि हो असे साचा ।
मोक्षाच्या शिखराला जाया बांधून दे मला माचा ॥ १० ॥

गुरुराया तूं सारी वारी माया तुझी जगन्नाथा।
बहु सुखरनरवीरां अजिंक्य हो ती करील मम घाता ॥ ११ ॥
घात तियेचा करण्या दुर्बल कीं फार हा तुझा दास।
ह्यास्तव मीं वांछितसे अति लीनत्वें तुझ्या प्रसादास ॥ १२ ॥
शौचस्नानानंतर तिसरी भिक्षा तसाच एकांत।
ह्यांवाचुनि तुज मुक्ता विधेयकर्मीं नसेच हो प्रांत ॥ १३ ॥
मानसमलनाशानें घडतें तुम्हांस हो सदा स्नान।
इंद्रियजय हें तुमचें शौच असे ना दुजें तुम्हां भान ॥ १४ ॥
भिक्षासेवन तुमचें ब्रह्मामृतपान कीं नव्हे आन।
पूर्णाद्वैतीं बसणें एकांताचें खरें तुम्हां स्थान ॥ १५ ॥
इतुक्या विरहित जें जें त्याचा अल्पहि कदा मला संग।
न घडावा ही भिक्षा घाली सद्गुरु सदा मला संग ॥ १६ ॥
विनती ऐशी अर्पण साईचरणीं करी ब्निोवा कीं।
आशा मनांत धरुनी गुरुकृपेची पुरी मिळो बाकी ॥१७॥

## —सद्गुरुस्वरूप—

(अभंग)

ब्रह्मज्ञाता साई स्वयें साक्षात्ब्रह्म। इतरांशीं काम नाहीं आम्हां ॥ १ ॥
गुरुरूपें तोचि आम्हां ब्रह्मा शौरी। महादेव गौरीरमण तो ॥ २ ॥
विष्णुमूर्ति दत्त आत्रेय जो झाला। साईरूपें आला आम्हांसाठीं ॥ ३ ॥
गणाधीश आणि रामकृष्ण पाही। वायुसुत तोहि भिन्न नसे ॥ ४ ॥
आदिमाता तैशी आणीक तो मित्र। सर्वहि एकत्र होती ब्रह्मीं ॥ ५ ॥
इतरावतार तैसे सारे संत। उपाधि अनंत रूप एक ॥ ६ ॥
नामरूपात्मक उपाधि ती जड। चैतन्य अखंड तोच दावी ॥ ७ ॥
महावाक्यबोधा अधिकारी नाहीं। उपाधींत कांहीं वसेना जो ॥ ८ ॥
उपाधि अनेक घेउनियां संत। अल्पज्ञा अनंत दाविताती ॥ ९ ॥
साईनेंहि दीनांकारणें उपाधी। घेतली समाधि टाको नियां ॥ १० ॥

हेंचि जाणोनियां लीन त्याच्या पायीं । रामय्यातें नाहीं ठाव अन्य ॥ ११ ॥
ब्रह्मानंद भोगी आणि त्याचा दाता । मूर्ति साईनाथा ज्ञानाची तूं ॥ १२ ॥
गगनाच्या ऐसा अद्वैती प्रत्यक्ष । महावाक्यीं लक्ष तूंचि देवा ॥ १३ ॥
देशकाल वस्तु परिच्छिन्नताहि । तुझ्या ठायीं नाहीं मला संगा ॥ १४ ॥
सर्वान्तर्यामी तूं तैसा गुणातीत । मी केवि पतित वर्णूं तूज ॥ १५ ॥
भावातीता होई वरदाता आतां । रामय्याचा माथा तुझ्यापायीं ॥ १६ ॥
दिव्य स्तोत्रीं देव स्तुति ज्याची गाती । तेथें माझी मति किती हीन ॥ १७ ॥
सोंमंग ज्या गाती सर्वांगीं वेदांच्या । तेथें माझी वाचा काय चाले ॥ १८ ॥
योगियांचें मना ध्यानेंचि जो गम्य । तो मला अगम्य सत्य आहे ॥ १९ ॥
सुरांसुरी सर्वां ज्याचा अंत नाहीं । त्याचा मला पाहि थांग कैंचा ॥ २० ॥
रामय्याचा ऐसा ईश साईनाथ । तया प्रणिपात साष्टांगेंसीं ॥ २१ ॥
ज्याच्या कृपें होती मुके वाचस्पति । पंगु उल्लंघिती गिरीवर ॥ २२ ॥
रामय्या ऐशिया साईनाथापायीं । ठेवितसे डोई नम्रभावें ॥ २३ ॥

## –द्वैताद्वैत–

(अभंग)

साखरेची गोडी खाणाराचि जाणें । न खाणारा नेणे तें अज्ञान ॥ १ ॥
स्वानुभवसिद्ध असती ज्या उक्ति । तर्काच्या त्या युक्ति तेथें फोल ॥ २ ॥
अपरोक्ष ज्ञान नाहीं स्वरूपाचें । त्याचे बोल कैंचे साच होती ॥ ३ ॥
ऐशी कधीं शंका स्वप्नींहि मी नाणी । चाले माझी वाणी सत्संगेंसी ॥ ४ ॥
संत ते अनंत सर्व एकरूप । जाणोनी स्वरूप बोलियेले ॥ ५ ॥
म्हास्तव हे बोल न होतील वाया । तूंचि साईराया वदवितां ॥ ६ ॥
द्वैताद्वैत ( भिन्न ) शून्य तया नांव । कांहीं त्यापासाव उद्भवेना ॥ ७ ॥
द्वैतीं द्वैतोत्पत्ति हेंहि असंबद्ध । न्यायशास्त्रसिद्ध हाचि पक्ष ॥ ८ ॥
अद्वैतावाचूनि द्वैताची उत्पत्ति । संभवते किती कोण्या न्यायें ॥ ९ ॥
न्यायान्वयें प्राप्त अद्वैत कारण । कार्य त्याचें पूर्ण द्वैतसृष्टि ॥ १० ॥
द्वैतमत ऐसें कुंठितचि होतें । बाकी जें राहतें तें अद्वैत ॥ ११ ॥

# अध्याय २५ वा.

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।
श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।
॥ श्रीसद्गुरूसाईनाथाय नमः ॥

सहज जातें मांडूनि दळतां । जेणें प्रवर्तविलें निज सच्चरिता ॥
काय अलौकिक तयाची कुशलता । भक्त सत्पंथा लाविले ॥ १ ॥
मोक्ष जो का परमपुरुषार्थ । त्याहूनिही गुरुचरण समर्थ ॥
सेवितां ऐसिया गुरुचरणींचें तीर्थ । मोक्ष नकळत घर रिघे ॥ २ ॥
होईल गुरु करुणाकर । तरीच सुखाचा हा संसार ॥
घडोनि येई न घडणार । लावील परपार क्षणार्धें ॥ ३ ॥
जरी जाहली इतुकी पोथी । कथा कथिलीसे अति संकळितीं ॥
साईची ती अगाध कीर्ति । ती म्यां किती वर्णावी ॥ ४ ॥
जीचेनि दर्शनें नित्यतृप्ती । जीचेनि सहवासें आनंद भुक्ती ॥
जीचेनि भवभय विनिर्मुक्ति । ती साईमूर्ती हारपली ॥ ५ ॥
जीचेनि परमार्थ मार्ग प्रवृत्ती । जीचेनि मायामोह निवृत्ति ॥
जीचेनि आत्यंतिक क्षेम प्राप्ति । ते साईमूर्ती हारपली ॥ ६ ॥
जीचेनि नव्हती भवभय भीती । जीचेनि जागृत न्यायनीती ॥
जीचेनि संकटीं मनास धृती । ते साईमूर्ती हारपली ॥ ७ ॥

ध्यानीं स्थापूनियां निजमूर्ती । साई जाई निजधामा प्रती ॥
निजावतारा करी समाप्ति । हे योगस्थिति अतर्क्य ॥ ८ ॥

पूर्ण होतां अवतार कृती । हारपली ती पार्थिवाकृति ॥
तरी हा ग्रंथ ही वाङ्मय मूर्ति । देईल स्मृति पदोपदीं ॥ ९ ॥

शिवाय ह्याचिया कथा परिसतां । मना लाभे जी एकाग्रता ॥
तज्जन्य शांतीची अपूर्वता । केवीं अवर्णीयता वर्णावी ॥ १० ॥

आपण श्रोते सर्व सूज्ञ । मी तो तुम्हांपुढें अल्पज्ञ ॥
तथापि हा साईचा वाग्यज्ञ । आदरा कृतज्ञ बुद्धीनें ॥ ११ ॥

कल्याणप्रद हा वाग्यज्ञ । पुढें करूनि मजसम अज्ञ ॥
पूर्ण करी निजकार्यज्ञ । श्रोते सर्वज्ञ जाणती ॥ १२ ॥

करूनियां एकाग्र मन । अभिवंदून साई चरण ॥
महामंगल परम पावन । करी जो श्रवण या कथा ॥ १३ ॥

जो भक्त भक्ति समन्वित । निजस्वार्थ साधावया उद्यत ॥
होऊनियां एकाग्र चित्त । कथामृत हें सेवील ॥ १४ ॥

साई पुरवील तयाचे अर्थ । पुरवील स्वार्थ आणि परमार्थ ॥
सेवा कधींही जाई न व्यर्थ । अंती तो कृतार्थ करील ॥ १५ ॥

चव्वेचाळीस अध्याय पोथी । साई निर्याण परिसलें अंतीं ॥
तरी ही या पोथीची प्रगती । ही काय चमत्कृति कळेना ॥ १६ ॥

गताध्यायीं साईनिर्याण । यथानुक्रम जाहलें पूर्ण ॥
तरी या साईलीलेची कातिण । विसंवेना क्षणभरी ॥ १७ ॥

पाहूं जातां नवल नाहीं । निर्याण केवळ देहास पाहीं ॥
जन्ममरणातीत हा साई । अव्यक्तीं राही पूर्ववत ॥ १८ ॥

देह गेला आकार गेला । अव्यक्तीं जैसा तैसाच ठेला ॥
देह निर्याणा मागून लीला । आहेत सकळांला अवगत ॥ १९ ॥
वर्णूं जातां त्याही अपार । परी न व्हावा ग्रंथ विस्तार ॥
म्हणून त्यांतील घेऊं सार । करूं कीं सादर श्रोतयां ॥ २० ॥
धन्य आमुची भाग्यस्थिती । कीं जे काळीं साई अवतरती ॥
तेच काळीं आम्हां हे सत्संगती । सहजावृत्ती लाधली ॥ २१ ॥
ऐसें असतांही चित्तवृत्ती । जरी नपवे संसार निवृत्ती ॥
जरी न जडे भगवंतीं प्रीती । याहोनि दुर्गती ती काय ॥ २२ ॥
सर्वेंद्रियीं साईची भक्ति । तीच कीं खरी भजन स्थिति ॥
ना तरी डोळां पाहतां मूर्ति । खिळी दातीं वाचेच्या ॥ २३ ॥
कान ऐकतां साई कीर्तन । रसना मधुर आम्ररसीं निमग्न ॥
करितां साईपादस्पर्शन । मृदूळीवर्जन खपेना ॥ २४ ॥
साईपासून क्षणही विभक्त । तो काय होईल साईभक्त ॥
तो काय म्हणावा चरणासक्त । संसारीं विरक्त हों नेणें ॥ २५ ॥
एका पती वांचूनि कोणी । येतां तिचिया मार्गावरुनी ॥
श्वशुर दीर भाऊ जाणूनि । होई वंदनीं सादर ॥ २६ ॥
पतिव्रतेचें निश्चळ अंतर । कदां न सांडी आपुलें घर ॥
निजपतीचाच प्रेमा अपार । आजन्म आधार तो एक ॥ २७ ॥
पतिव्रता साध्वी सती । अन्या भावोनियां निजपति ॥
तयाचें दर्शन घ्यावयो मती । कधींही चित्तीं आणीना ॥ २८ ॥
तीस अपुला पती तो पती । इतर केव्हांही तया न तुलती ॥
तया ठायींच अनन्य प्रीति । शिष्यही ते रीती गुरुपायीं ॥ २९ ॥

पतिव्रतेच्या पतिप्रेमा । गुरुप्रेमास देती उपमा ॥
परि त्या प्रेमास नाहीं सीमा । जाणें तो महिमा सच्छिष्य ॥ ३० ॥

मग ना जयाचेनि संसारा साह्यता । तीं काय साह्या येतील परमार्था ॥
असो न्याही जांवयी वा वनिता । भरंवसा कोणाचा धरितां नये ॥३१॥

माता पिता करितील ममता । सत्तेचा पुत्र लक्षील वित्ता ॥
कुंकुवालागीं रडेल कांता । कोणी न परमार्था साहकारी ॥ ३२ ॥

तरी आतां राहिलें कोण । जयाचेनि परमार्थापादन ॥
करूं जातां विचारें निदान । आपुला आपण अंतीं उरे ॥ ३३ ॥

करोनि नित्यानित्य विवेक । त्यागोनि फळ भोग ऐहिकामुष्मिक ॥
साधोनियां शमदमादिषट्क । मोक्षैक साधक तो धन्य ३४ ॥

तेणें सोडूनि दुजियाची आस । ठेवावा बळकट आत्मविश्वास ॥
मारावी आपण अपुली कांस । साधेल तयासचि परमार्थ ॥ ३५ ॥

ब्रह्म नित्य जग अनित्य । गुरुरेक ब्रह्मसत्य ॥
अनित्यत्यागें गुरु एक चिंत्य । भावनासातत्य साधन हें ॥ ३६ ॥

अनित्यत्यागें वैराग्य जनन । सद्गुरु ब्रह्मचैतन्य घन ॥
उपजे भूतीं भगवंतपण । अभेद भजन या नांव ॥ ३७ ॥

भयें अथवा प्रेमें जाण । जया जयाचें नित्य ध्यान ॥
ध्यातां होई ध्येयचि आपण । कंसरावण कीटकी ॥ ३८ ॥

चिंतनीं व्हावें अनन्यपण । ध्याना सारिखें नाहीं साधन ॥
करी जो अभ्यास आपुळा आपण । तया निजोद्धरण रोकडें ॥ ३९ ॥

तथें कैचें जन्म मरण । जीवभावासी पूर्ण विस्मरण ॥
प्रपंचाचें मावळे भान । आत्मानुसंधानसुख लाहे ॥ ४० ॥

म्हणोनि निजगुरुनामावर्तन । तेणेंनि परमानंदा जनन ॥
भूतीं भगवंताचें दर्शन । नामाचें महिमान काय दुजें ॥ ४१ ॥
ऐसी जयाच्या नामाची महती । तया माझी सद्भावें प्रणती ॥
कायावाचामनें मी त्या प्रती । अनन्यगती ये शरण ॥ ४२ ॥
ये अर्थाची द्योतक कथा । कथितों श्रोतयांकरितां आतां ॥
तरी ती ऐकिजे निजहितार्था । एकाग्रचित्त करूनियां ॥ ४३ ॥
कैलासवासी काका दीक्षित । साईसमर्थ आज्ञांकित ॥
नित्यनेम वाचीत भागवत । आहे कीं अवगत समस्तां ॥ ४४ ॥
एके दिवशीं दीक्षितांनीं । काका महाजनी यांचे सदनीं ॥
चौपाटीवर भोजन सारुनी । पोथी नेमानीं वाचिली ॥ ४५ ॥
एकादशाचा अद्वितीय । ऐसा तो सरस आणि द्वितीय ॥
परिसतां अनुक्रमें अध्याय । श्रोत्यांचें धाय अंतरंग ॥ ४६ ॥
माधवराव बाबांचे भक्त । काका महाजनी तयां समवेत ॥
बैसले ऐकावया भागवत । एकात्र चित्त करूनियां ॥ ४७ ॥
कथाही भाग्यें फारचि गोड । जेणें पुरेल श्रोत्यांचें कोड ॥
जडेल भगवद्भक्तीची आवड । ऐसीच ती चोखड निघाली ॥ ४८ ॥
ऋषभ कुळींचे नऊ[1] दीपक । कवि हरी अंतरिक्षादिक ॥
निघालें यांचेंच गोड कथानक । आनंदजनक बोधप्रद ॥ ४९ ॥
नऊही ते भगवत्स्वरूप । पोटीं क्षमा शांती अमूप ॥
वर्णितां भागवत धर्मप्रताप । जनक[2] निष्कंप तटस्थ ॥ ५० ॥
काय तें आत्यंतिक क्षेम । काय हरीची भक्ति परम ॥
कैसेन ही हरि मायासुगम । निःश्रेयस उत्तम गुरुचरण ॥ ५१ ॥

---

१ कवि, हरि, अंतरिक्ष, प्रबुद्ध, पिप्पलायन, आविर्होत्र, द्रुमिल, चमस, करभाजन. २ जनकराजा.

कर्म अकर्म आणि विकर्म । या सर्वांचें एकचि वर्म ॥
गुरू हेंच रूप परमात्म । भागवत धर्म गुरुभक्ति ॥ ५२ ॥

हरिचरित्र अवतार गुण । द्रुमिल नाथें केलें निरूपण ॥
पुरुषावताराची दावूनि खूण । रूपें नारायण वर्णिला ॥ ५३ ॥

पुढें अभक्त गति विन्यास । विदेहा कथी नाथ चमस ॥
वेदविहित कर्माची कांस । सोडिल्या हो नाश सर्वस्वीं ॥ ५४ ॥

सर्वांतरीं हरीचा वास । म्हणोनि न करावा कोणाचा द्वेष ॥
पिंडीं पिंडीं पहावा परेश । रिता न रेस त्यावीण ॥ ५५ ॥

अंती नववे कर भजन । कृतत्रेतादि युगींचें पूजन ॥
कैशा कैशा मूर्तींचें ध्यान । करिते निर्वचन जाहले ॥ ५६ ॥

कलियुगीं एकचि साधन । हरि गुरू चरण स्मरण ॥
तेणेंच होय भवभयहरण । हें एक निज शरण शरणागता ॥ ५७ ॥

ऐसी पोथी जाहल्याअंतीं । काकासाहेब पृच्छा करिती ॥
काय हो ही नवनाथकृति । अतर्क्य वृत्ति तयांची ॥ ५८ ॥

आवडी माधवरावांस वदती । किती हो ही अवघड भक्ती ॥
आम्हां मूढां कैची हे शक्ति । जन्मजन्मांतीं न घडे हें ॥ ५९ ॥

कोठें हे नाथ महाप्रतापी । कोठें आपण ठायींचे पापी ॥
आहे काय भक्ती हे सोपी । सच्चिद्रूपी ते धन्य ॥ ६० ॥

आम्हा ही भक्ती घडेल काय । कैसेन होईल तरणोपाय ॥
जाहलों हताश गळाले पाय । झाला कीं वायफळ जन्महा ॥ ६१ ॥

काकासाहेब भक्त प्रेमळ । असावी जीवास कांहीं हळहळ ॥
सुस्थिरवृत्ति व्हावी कां चंचळ । उडाली खळबळ शामाची ॥ ६२ ॥

शामानामें माधवराव । जयांचा काकालागीं सद्भाव ॥
तयांस काकांचा हा स्वभाव । दैन्याचा प्रभाव नावडला ॥ ६३ ॥

म्हणती बाबांसारिखें लेणें । भाग्यें लाधलें जयासी तेणें ॥
मुख करावें कैंविलवाणें । व्यर्थ कीं जीणें तयाचें ॥ ६४ ॥

साईचरणी श्रद्धा अढळ । तरी ही कां मनाची तळमळ ॥
नाथांची भक्ति असेना प्रबळ । अपुलीही प्रेमळ नव्हे का ? ॥६५॥

एकनाथी टीकेसहित । एकादशस्कंध भागवत ॥
वाचावें भावार्थ रामायण नित । आपणा निश्चित ही आज्ञा ॥ ६६ ॥

तैसेंच हरिगुरु नामस्मरण । ही बाबांची आज्ञा प्रमाण ॥
यांतचि अपुलें भवभय तारण । चिंतेचें कारण काय तुम्हा ? ॥ ६७ ॥

परी त्या नवयोग्याचें चरित । तयाचें तें असिधाराव्रत ॥
साधेल काय आपणा यत्किंचित । चिंतन हें सतत काकांचें ॥ ६८ ॥

लागली जीवास मोठी चुटपुट । नव योग्यांची भक्तीच उद्भट ॥
कवण्या उपायें होईल प्रगट । तरीच मग निकट देव खरा ॥ ६९ ॥

असो ऐसी लागली हुरहुर । आसनीं शयनीं हाच विचार ॥
उदयीक घडला चमत्कार । श्रोतीं तो सविस्तर परिसावा ॥ ७० ॥

अनुभवाचा पहा नवलाव । प्रातःकालींच आनंदराव ॥
पाखाडे हें जया उपनांव । आले माधवराव शोधावया ॥ ७१ ॥

तेही आले प्रातःकाळीं । भागवत वाचावयाचे वेळीं ॥
बैसले माधवरावाजवळी । स्वप्नाची नवाळी सांगत ॥ ७२ ॥

इकडे चालली आहे पोथी । तिकडे परस्पर दोघे फुसफुसती ॥
तेणें श्रोत्या वक्त्यांचे चित्तीं । अस्थैर्य स्थिती पातली ॥ ७३ ॥

आनंदराव चंचल वृत्ति । माधवरावांस स्वप्न कथिती ॥
वदतां परिसतां दोघे कुजबुजती । राहिली पोथी क्षणभर ॥ ७४ ॥

काकासाहेब तंव त्यां पुसती । काय ती ऐसी नवल स्थिती ॥
दोघेच तुम्ही आनंदित वृत्ति । सांगा न आम्हा प्रती काय कीं ॥ ७५ ॥

तव ते माधवराव वदती । कालच कीं आपणा शंका होती ॥
समाधान घ्या हातोहातीं । तारक भक्ति लक्षण ॥ ७६ ॥

परिसा पाखाड्यांचें स्वप्न । दिधलें बाबांनीं कैसें दर्शन ॥
होईल अपुल्या शंकेचें निरसन । गुरुपदवंदन भक्ति पुरे ॥ ७७ ॥

मग तें स्वप्न ऐकावयाची । प्रबळ जिज्ञासा त्यां सर्वांची ॥
विशेषें काकासाहेब यांची । शंकाही तयांचीच आरंभीं ॥ ७८ ॥

पाहोनियां सर्वांचा भाव । स्वप्न सांगे आनंदराव ॥
चित्तीं ठेवोनियां सद्भाव । श्रोत्यांसही नवलाव दाटला ॥ ७९ ॥

एका महा समुद्रांत । उभा मी कंबरभर उदकांत ॥
तेथें माझिया दृष्टिपथांत । आले श्रीसमर्थ अकल्पित ॥ ८० ॥

रत्नखचित सिंहासन । वरी साई विराजमान ॥
उदकांतर्गत जयांचे चरण । ऐसें तें ध्यान देखिलें ॥ ८१ ॥

पाहूनि ऐसें मनोहर ध्यान । जाहलें अत्यंत समाधान ॥
तें स्वप्न हें कोणास भान । मन सुखसंपन्न दर्शनें ॥ ८२ ॥

काय त्या योगाचा नवलाव । तेथेंच उभे माधवराव ॥
पाया पडा हो आनंदराव । वदले मज भावपुरःसर ॥ ८३ ॥

तंव मी तयां प्रत्युत्तर देत । इच्छा माझीही आहे बहुत ॥
परी ते पाय उदकांतर्गत । कैसे मज हातांत येतील ॥ ८४ ॥

उदकामाजी पाय असतां । कैसा पायीं ठेवूं माथा ॥
तरी मी काय करावें आतां । नकळे मज तत्वतां कांहींही ॥ ८५ ॥
ऐसें परिसूनि माधवराव । परिसा बाबांस वदले काय ॥
देवा काढ रे वरतीं पाय । आहेत जे तोय प्रच्छन्न ॥ ८६ ॥
ऐसें वदतांच तत्क्षण । काढिले बाबांनीं बाहेर चरण ॥
आनंदरावांनीं मग ते धरून । केलें अभिवंदन अविलंबें ॥ ८७ ॥
ऐसे धरितां दृढ चरण । बाबांनीं दिधलें आशिर्वचन ॥
होईल जारे तुझें कल्याण । कांहीं न कारण भीतीचें ॥ ८८ ॥
आणीक बाबा वदले देख । रेशीम कांठी धोतर एक ॥
शाम्यास माझ्या देऊन टाक । तुज सुखदायक होईल ॥ ८९ ॥
तरी ती वंदूनि आज्ञा शिरीं । धोतर म्यां आणिलें रेशीमधारी ॥
काकासाहेब आपण तें स्वकरीं । माधवराव स्वीकारी ऐसें करा ॥ ९० ॥
मान्य करा जी ही मम विनंती । माधवराव हें परिधान करिती ॥
करा ऐसें सुखवा मजप्रती । होईन मी अति उपकारी ॥ ९१ ॥
आनंदरावाची ही मात । माधवराव स्वयें परिसत ॥
काकासाहेब जंव तें देत । ते न स्वीकारित तें वस्त्र ॥ ९२ ॥
तयांचे मनीं हें तो स्वप्न । आम्हास पटली पाहिजे खूण ॥
दृष्टांत कांहीं जाहल्याविण । घ्यावें न आपण हें वस्त्र ॥ ९३ ॥
काकासाहेब तेव्हां वदत । आतां बाबांची पाहूं प्रचीत ॥
घेणें हे उचित अथवा अनुचित । होईल तें सूचित चिठ्यांनीं ॥ ९४ ॥
देतील बाबा चिठ्ठी जैसी । मानूं तयांची आज्ञा तैसी ॥
चिठ्या बाबांचिया पायापासीं । कृतसंकल्पेसी टाकिल्या ॥ ९५ ॥

१ श्रीसाईबाबांस माधवराव देशपांडे देवा म्हणून नेहमी संबोधीत.

काकासाहेब यांचा भार । होता सर्वस्वीं साईचियावर ॥
आधीं घ्यावा त्यांचा विचार । करावा तो व्यवहार पुढारा ॥ ९६ ॥
हें तों बाबांचे हयातींत । तोच कीं क्रम तयांचे पश्चात ॥
चिठ्या टाकून आज्ञा घेत । तैसेच ते वर्तत निश्चयें ॥ ९७ ॥
कार्य मोठें अथवा सान । चिठ्ठीनें आज्ञा घेतल्यावीण ॥
कांहीं न करणें गेलिया प्राण । अनुज्ञाप्रमाण सर्वथा ॥ ९८ ॥
देहचि जेथें नाहीं अपुला । एकदां बाबांच्या पाईं वाहिला ॥
मग तयाच्या चलनवलनाला । काय अपुल्या अधिकार ॥ ९९ ॥
पहा या एक भावनेवर । लाखों रुपयांचे कमाईवर ॥
लाथ मारिली परी हा निर्धार । दृढ आमरणांत राखिला ॥ १०० ॥
फळा येईल तुझें इमान । धाडीन मी तुजलागीं विमान ॥
नेईन त्यांत बैसवून । निश्चिंत मन राही तूं ॥ १०१ ॥
ही बाबांची प्रसादोक्ति । अक्षरें अक्षर आली प्रतीति ॥
साईलीला वाचकांप्रति । ठावी निर्गम स्थिती काकांची ॥ १०२ ॥
होतां तया स्थितीचें स्मरण । आणीक तें काय विमान प्रयाण ॥
काय तें आनंदाचें मरण । गुरुनामावर्तन समवेत ॥ १०३ ॥
ऐसे दीक्षित करारी आपण । चित्तीं निरंतर साई चरण ॥
इष्ट मित्रांही देऊनि शिकवण । जाहले विलीन गुरुपाईं ॥ १०४ ॥
आतां पूर्वानुसंधान स्थिति । दोघांही मानली चिठ्ठ्यांची युक्ति ॥
कारण दोघांची काकांवर प्रीति।चिठ्ठ्या मग लिहिविती अविलंबें ॥१०५॥
एका चिट्टींत 'घ्यावें धोतर'। दुसरींत 'त्याचा करावा अव्हेर' ॥
ऐसें लिहून साईच्या पायावर । टाकिल्या छाया चित्रातळीं ॥ १०६ ॥

तत्रस्थ एका अर्भकास । त्यांतील चिठ्ठी उचलावयास ॥
लावितां धोतर घ्यावयास । माधवरायांस दे आज्ञा ॥ १०७ ॥
जैसें स्वप्न तैसीच चिठ्ठी । आनंद झाला सकळां पोटीं ॥
मग तें धोतर रेशिम कांठी । घातलें करसंपुटीं शामाचिया ॥ १०८ ॥
ह्यांचें स्वप्न यांची चिठ्ठी । परस्परांशीं पडतां मिठी ॥
परमानंद न माय पोटीं । सुखसंतुष्टी उभयांतें ॥ १०९ ॥
माधवराव अंतरीं खूष । आनंदरावासही संतोष ॥
झाला साइभक्ति परिपोष । आशंका निरास काकांचा ॥ ११० ॥
असो या सर्व कथेचें सार । ज्याचा त्याणें करावा विचार ॥
ठेविल्या गुरुपायावर शीर । गुरुवदनोद्गार लक्षावे ॥ १११ ॥
आपणाहून आपुली स्थिती । आपुली भूमिका वा चित्तवृत्ति ॥
गुरु जाणे नखशिखांतीं । उद्धारगतीही तोच ॥ ११२ ॥
जैसा रोग तैसें निदान । तैसेंच औषध वा अनुपान ॥
सद्गुरुनेमी शिष्यालागून । भवरोग-निवारण कार्यार्थ ॥ ११३ ॥
स्वयें तो जी करितो करणी । आणूं नये अपुले अनुकरणीं ॥
तुम्हा कारणें गुरुमुखांतुनी । निघेल ती वाणी आदरावी ॥ ११४ ॥
त्याच शब्दांवर ठेवावें मन । तयांचेंच नित्य करावें चिंतन ॥
तेंच तुमच्या उद्धारा कारण । ठेवा हें स्मरण निरंतर ॥ ११५ ॥
गुरु सांगे तें पोथीपुराण । तें तों तद्वचन स्पष्टीकरण ॥
मुख्य उपदेशीं ठेवा ध्यान । तें निगमज्ञान आपुलें ॥ ११६ ॥
कोणाही संताचें वचन । त्याचा करूं नये अवमान ॥
आपुली माय आपुली जतन । करील तीं अन्य कोण करी ॥ ११७ ॥

खरा मायेचा जिव्हाळा । लेंकुरालागीं तिचा कनवाळा ॥
बाळ नेणें तो सुखसोहळा । घेईल तो लळा ती पुरवी ॥ ११८ ॥

संत सृष्टींमाजी उमाप । "आपुला बाप तो अपुला बाप" ॥
साई मुखीचे हे करुणालाप । कोरा स्वहृदयपटावरी ॥ ११९ ॥

म्हणोनि साईमुखीचें वचन । तेथेंच ठेवा अनुसंधान ॥
अंतीं तोच कृपानिधान । तापत्रय शमन करील ॥ १२० ॥

तोच जाणें त्याची कळा । आपण पहावें कौतुक डोळां ॥
काय अद्भुत तयाच्या लीळा । सहज अवलीला घडती ज्या ॥ १२१ ॥

दुसरा एक म्हणतो म्हणून । त्याचें सर्व घ्यावें ऐकून ॥
मोडूं न द्यावें निजानुसंधान । निजगुरुवचन विसरूं नये ॥ १२२ ॥

यांतचि आहे परमकल्याण । यांतचि आहे भवभयतरण ॥
यांतचि अवघें पोथीपुराण । जपतपानुष्ठानचि हें ॥ १२३ ॥

सारांश प्रेम करा गुरुवर । अनन्यभावें नमस्कार ॥
दिनकरापुढें कैंचा अंधार । तयांसी भवसागर नाहींच ॥ १२४ ॥

असा कुठेंही सृष्टीवर । निकट अथवा कितीही दूर ॥
सातासमुद्राच्याही पार । भक्तार्थ अनिवार प्रेमळ ॥ १२५ ॥

असो ऐसें हें लिहितां लिहितां । कथा एक आठवली चित्ता ॥
एकाचें पाहूनि दुज्यानें करितां । कैसिया आपदा होत जीवा ॥ १२६ ॥

एकदां बाबा मशिदींत । असतां म्हाळसापती समवेत ॥
पूर्वील फळीची शेज अवचित । स्मरे अकल्पित तयांतें ॥ १२७ ॥

हंदी अवघी सवावीत । दोनी टोंकांस चिंध्या बांधित ॥
मशिदीचिया आढ्यास टांगित । झोंपाळा करित तियेचा ॥ १२८ ॥

निजूं नये अंधारांत । तदर्थ उन्नापायध्या लगत ॥
ठेवूनि रात्रौ पणत्या जळत । बाबा निजत फळीवर ॥ १२९ ॥
या फळीचें समूळ वृत्त । पूर्वील एका अध्यायांत ॥
आधींच वर्णिलें आहे येथ । परिसा कीं महत्व तियेचें ॥ १३० ॥
एकदां या फळीची महती । मनोभावें बाबा वर्णिती ॥
काकासाहेब दीक्षिताचित्तीं । उद्भेली वृत्ती ती परिसा ॥ १३१ ॥
म्हणती मग ते बाबांप्रती । फळीवरी शयनप्रीति ॥
असेल तरी ती टांगतों प्रीती । मग स्वस्थ चित्तीं पहुडावें ॥ १३२ ॥
बाबा तयांस प्रत्युत्तर देती । खालीं टाकून म्हाळसापती ॥
आपणचि वर निजावें केउती । बरा मी खालतीं आहे तो ॥ १३३ ॥
त्यावर काका अतिप्रीती । आणीक फळी टांगूं म्हणती ॥
आपण निजावें एकीवरतीं । म्हाळसापती दुसरीवर ॥ १३४ ॥
त्यावरी पहा बाबांचें उत्तर । तो काय निजतो फळीवर ॥
जया अंगीं गुण प्रकर । तोच फळीवर निजेल ॥ १३५ ॥
नाहीं फळीवर शयन सोपें । कोण तियेवर मजवीण झोंपे ॥
नयन उघडे निद्रा लोपें । तयासचि झेपे हें शयन ॥ १३६ ॥
मी जें करूं लागें शयन । तें मी करी यांसी आज्ञापन ॥
'करमद् हृदयावरी ठेवून । राही बैसून सन्निध' ॥१३७॥
तेंही काम यास न होई । बसल्या जागीं डुलक्या घेई ॥
तया न फळी ही कामाची कांहीं । फळी ही बिछाइत माझीच ॥१३८॥
'नामस्मरण चाले हृदयांत । पाहे तेथें ठेवूनि हात ॥
निजतां मी मज करी जागृत' । ऐसा अनुज्ञापित तो असतां ॥ १३९ ॥

---

१ समुदाय. २ म्हाळसापतीस.

त्यासचि निद्रा लागतां जड । फर हो त्याचा जैसा दगड ॥
" भगत " म्हणतां नेत्राची झापड । उडूनि खडवड जो करी ॥१४०॥

वसवे न जया धरेवर । आसन जयाचें नाहीं स्थिर ॥
जो नर निद्रातमकिंकर । निजेल उंचावर केवीं ॥ १४१ ॥

म्हणोनि 'अपुले अपुल्यासंगें । दुजियाचें तें दुजियासंगें' ॥
हें तों बाबा वेळ प्रसंगें । भक्तानुरागें अनुवदत ॥ १४२ ॥

अगाध साईनाथांची करणी । म्हणूनि हेमाड लागला चरणीं ॥
तयांनीं ही कृपाशिर्वचनीं । ठेविला निजस्मरणीं अखंड ॥ १४३ ॥

इतिश्री संतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ।
श्री साईसमर्थ सच्चरिते । श्रीगुरुचरण महिमानाम
पंचचत्वारिंशोध्यायः संपूर्णः ॥
श्रीसद्गुरूसाईनाथार्पणमस्तु । शुभंभवतु ॥

शिर्डी येथील

श्री सद्गुरु

# साईनाथ सगुणोपासना.

हें पुस्तक मूळ वे॰ सं॰ ह॰ भीष्म यांनीं शके १८३३ त तयार केलें होतें. सांप्रत त्याची सुधारून वाढलेली नवीन आवृत्ती छापण्यांत आली आहे.

श्रीसमर्थ साईनाथ महाराज यांच्या त्रिकाल आरतीचे वेळीं म्हटली जाणारी पद्यें व भजनकाळीं म्हणावयाजोगीं सदर शास्त्री भीष्म यांनीं तयार केलेलीं पद्यें, परापूजा व मानसपूजा यांचा या लहानशा पुस्तकांत संग्रह केला आहे. पुस्तकाची किंमत दोन आणे ठेविली आहे.

**हरि सीताराम दीक्षित**

पुस्तक मिळण्याचें ठिकाण—श्री साईलीला ऑफीस.

**रा. रा. गोविंद रघुनाथ दाभोलकर,**

५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रें.

**चिटणीस श्री शिर्डी संस्थान कमिटी**

शिर्डी, पो. राहते, जि. अहमदनगर

---

# श्री साईनाथ भजनमाला

## सुधारून वाढविलेली आवृत्ति

मालेचे कर्ते रा. रघुनाथराव तेंडुलकर यांच्या निधनानंतर आतां मालेची पुनरावृत्ती छापविणें नाहीं. साईभक्तांनीं माला मागविण्याची त्वरा करावी; कारण प्रती फार थोड्या शिल्लक राहिल्या आहेत.

**सावित्रीबाई तेंडुलकर.**

माला मिळण्याचा पत्ता:—**श्रीमति सावित्रीबाई तेंडुलकर,**

रंगाऱ्याची चाळ, वांद्रें. बी. बी. सी. आय्. रेल्वे.